पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ५५ ● सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

वागण्यात खोटेपणा नसला की जगण्यात मोठेपणा लवकर मिळवता येतो.




# आर आर सी ने महाराष्ट्रात झेप घ्यावी : मुख्यमंत्री

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट





**नागपूर:** विदर्भाच्या पावन भूमीशी अभेद्य नाळ जोडलेल्या 'आर आर सी' न्यूज नेटवर्कने केवळ प्रादेशिक सीमांपर्यंत मर्यादित न राहता, संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपल्या कर्तृत्वाचा ध्वज फडकवत एक नवी उत्तुंग झेप घ्यावी, अशा ओजस्वी शब्दांत महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'आर आर सी' समूहाला उदंड शुभेच्छा दिल्या. नागपूर येथे पार पडलेल्या एका विशेष सदिच्छा भेटीदरम्यान मुख्यमंत्र्यांनी आर आर सी न्यूजच्या सामाजिक बांधिलकीने आणि ध्येयनिष्ठेने प्रेरित पत्रकारितेचा गौरव केला.

नजीकच्या काळात आकारास येत असलेल्या 'आर आर सी फाऊंडेशन'च्या माध्यमातून लोककल्याणाच्या संकल्पाबद्दल मुख्यमंत्र्यांनी पंकज देशमुख यांचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी आर आर सी समूहाचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख, नागपूर भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष रोहित लोहिया, चिन्मय देशमुख तसेच युवा उद्योजक हितेश अग्रवाल यांची अतिशय प्रामुख्याने उपस्थिती होती.

आर आर सी समूहाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित गौरव सोहळ्याचे आदरपूर्वक निमंत्रण देण्यासाठी आर आर सी समूहाचे नेतृत्व करणारे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. अत्यंत धावपळीच्या व व्यस्त वेळापत्रकातही मुख्यमंत्र्यांनी अत्यंत अगत्याने आर आर सी च्या यशस्वी वाटचालीचा सविस्तर आढावा घेतला.

विदर्भातील जनतेच्या अडीअडचणी, लोकभावना आणि विकासाचा महाआलेख निडरपणे मांडण्यात आर आर सी न्यूजने बजावलेली भूमिका अत्यंत प्रशंसनीय असल्याचे गौरवलोद्गार त्यांनी यावेळी काढले. आर आर सी न्यूज समूहाने गेल्या अडीच दशकांच्या प्रदीर्घ प्रवासात निष्पक्ष, निर्भीड आणि लोककल्याणकारी पत्रकारितेचे जे अमूल्य आदर्श प्रस्थापित केले आहेत, त्याला मुख्यमंत्र्यांच्या या खंबीर पाठबळामुळे एक नवी चेतना लाभली आहे.




पश्चिम विदर्भाच्या मातीतून सुरू झालेला हा दैदीप्यमान प्रवास आता संपूर्ण महाराष्ट्रावर आपल्या कर्तृत्वाची अथांग मुद्रा उमटवण्यासाठी पूर्ण ताकदीने सज्ज झाला आहे. आर आर सी च्या या ऐतिहासिक रौप्य महोत्सवी यशाबद्दल आणि भावी वाटचालीसाठी सर्वच स्तरातून आणि मान्यवरांकडून अभिनंदनाचा अखंड वर्षाव होत आहे.

### अकोलेकरांची प्रभु राजराजेश्वरावर अढळ आणि निस्सीम भक्ती - मुख्यमंत्री

अकोल्यातील जगप्रसिद्ध आणि समृद्ध परंपरा लाभलेल्या भव्य कावड उत्सवाचा विशेष गौरव करत मुख्यमंत्र्यांनी या भक्तिमय सोहळ्यात सहभागी होण्याची प्रबळ इच्छा व्यक्त केली. 'अकोलेकरांची देवांचे देव भगवान राजराजेश्वरावर अथांग व निस्सीम भक्ती आहे. अकोल्यातील या अद्भूत कावड महोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह डोळ्यांत साठवण्यासाठी श्रावणातील अंतिम सोमवारी उपस्थित राहण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन,' असे आश्वस्त मनोगत त्यांनी व्यक्त केले. पवित्र श्रावण मासाच्या मंगल प्रसंगी संपूर्ण शिवभक्तांना हार्दिक शुभेच्छा देत, आर आर सी समूहाच्या वर्धापन दिन सोहळ्यास अकोल्यात आवर्जून हजेरी लावेन, असा दृढ विश्वासही त्यांनी यावेळी दर्शवला.

### मुख्यमंत्र्यांची पाठीवर पडलेली कौतुकाची थाप नवचैतन्यदायी - पंकज देशमुख

या प्रसंगी कृतज्ञता व्यक्त करताना आर आर सी समूहाचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख म्हणाले, 'माननीय मुख्यमंत्र्यांचे हे अमूल्य मार्गदर्शन आणि पाठीवर पडलेली कौतुकाची थाप आमच्या संपूर्ण टीमसाठी प्रचंड ऊर्जादायी व प्रेरणादायी आहे. २५ वर्षांच्या या रौप्य महोत्सवी प्रवासात विदर्भातील जनतेने आम्हाला अपार आपुलकी आणि उदंड प्रेम दिले. आता मुख्यमंत्र्यांच्या प्रेरणेने विदर्भाचा हा प्रखर, सत्यशोधक आणि लोकहितैषी आवाज संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अधिक ताकदीने पोहोचवण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.'

## »थोडक्यात

### नेपाळच्या पुरातून निघाला खजिना!

**काठमांडू :** नेपाळमध्ये आलेल्या अचानक भीषण पुरामुळे मोठी हानी झाली आहे. या जलप्रलयामुळे इमारती, गावच्या गावं, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. या पुरात आतापर्यंत ७८१ जणांचा मृत्यू झाला आहे. पुराचे पाणी नुवाकोट जिल्ह्यातील त्रिशूली परिसरात असलेल्या कृषी विकास बँकेच्या शाखेतही शिरले आणि संपूर्ण बँक परिसर पाण्याखाली गेला. काही दिवसांनंतर परिस्थिती काहीशी सामान्य झाल्यावर बँकेत अडकलेली कोट्यवधी रुपयांची संपत्ती सुरक्षित बाहेर काढण्यासाठी बचाव आणि मदतकार्य सुरू करण्यात आले. पोलीस आणि संबंधित पथकांनी सुमारे ८ तास सातत्याने अभियान राबवून बँकेत ठेवलेल्या मौल्यवान धातू आणि रोख रक्कम सुरक्षितपणे बाहेर काढली.

---

### शिंदेंची नजर मुंबई बँकेवर!

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या राजकीय समीकरणांची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहकार क्षेत्रात आमनेसामने येण्याची शक्यता दिसतंय. शिंदे यांच्या शिवसेनेचा मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उतरण्याचा निर्णय झाल्याची सूत्रांची माहिती आहे. या वर्षी डिसेंबर किंवा जानेवारीत निवडणूक होण्याची शक्यता आहे. ज्यात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे आमने सामने येऊ शकतात.

---

### दिल्लीतील स्लीपर बसमध्ये विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार!

नवी दिल्ली : येथे एका १६ वर्षीय विद्यार्थिनीवर स्लीपर बसमध्ये सामूहिक अत्याचार झाल्याची अत्यंत गंभीर आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. काश्मिरी गेट परिसरातील एका स्लीपर बसमध्ये ही घटना घडली असून, या प्रकरणात बसच्या चालक आणि वाहकाला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित विद्यार्थिनी उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्याची रहिवासी आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या व्यक्तींकडूनच असे कृत्य घडल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

# भाजपला आरएसएसपेक्षा मोठे असल्याचे वाटतेय : दिपके

## पंतप्रधान मोदी भागवतांचे ऐकत नसल्याचा आरोप

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**छत्रपती संभाजीनगर :** भाजपच्या लोकांनी सरसंघचालक मोहन भागवत यांचे म्हणणे ऐकले पाहिजे. मात्र, सध्या भाजपच्या लोकांना आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघापेक्षाही (आरएसएस) मोठे असल्याचे वाटू लागले आहे, असे वक्तव्य कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केले. गेल्या १२ वर्षांपासून भाजप सत्तेत आहे. त्यामुळे सगळ्या यंत्रणा त्यांच्या ताब्यात आहेत. यामुळेच भाजपला आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघापेक्षा मोठे असल्याचे वाटू लागले असल्याचे दिपके यांनी म्हटले.भाजपने मोहन भागवत काय सांगतात, ते थोडं तरी ऐकले पाहिजे. मोहन भागवत म्हणाले होते की, जेन झी आंदोलन करत आहेत त्यांना देशद्रोही म्हणू नका. त्यानंतरही पंतप्रधान 'दिमागी नक्सल' ही नवी संज्ञा वापरात आणतात. यावरुन एक स्पष्ट दिसतंय की, पंतप्रधान मोदी आणि भाजप हे दोघेही मोहन भागवतांचं म्हणणं ऐकत नाहीत. एकीकडे मोहन भागवत सर्वसमावेशकतेची भाषा करतात, विद्यार्थ्यांचा अपमान करु नका सांगतात. पण पंतप्रधान मोदी 'दिमागी नक्सल' म्हणतात, हे चांगलं वाटत नाही. आमचं नाही तर तुमचे मार्गदर्शक असलेल्या मोहन भागवतांचं तरी ऐका, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तरी ऐका. त्यांच्यामुळे तुम्ही सत्तेत आला आहात, हे लक्षात ठेवा, असे अभिजीत दिपके यांनी म्हटले. यावर आता भाजपचे नेते काय प्रतिक्रिया देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.



### भागवतांच्या न्यूयॉर्कमधील वक्तव्याची चर्चा

विविध धर्मांचे मार्ग वेगवेगळे असू शकतात. परंतु धर्मापलीकडे मानवता हा एक धर्म आहे. आम्ही अशा समाजातून येतो जिथे संपूर्ण मानवता एक मानली जाते. जर तुम्ही स्वत:ला हिंदू म्हणवून घेत असाल तर सर्व मार्ग एकाच ईश्वराकडे जातात आणि प्रत्येक माणसाचा सन्मान केला पाहिजे. भारतामध्ये मुस्लिमांना स्थान नसावे असे मानणारी व्यक्ती कधीही खरा हिंदू असू शकत नाही, असे मोहन भागवत यांनी म्हटले. त्यांचे हे वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

### अभिजीत दिपके काय म्हणाले?

“मी हे आधीपासून सांगत आहे की भाजपाच्या लोकांनी थोडं तरी मोहन भागवत यांचं ऐकलं पाहिजे. मला वाटतं की १२ वर्ष सत्ता हातात असताना आणि एवढ्या सर्व यंत्रणा हातात असल्यामुळे भाजपाला असं वाटतंय की ते आरएसएस पेक्षा मोठे झाले. पण भाजपाने थोडं तरी मोहन भागवत यांचं ऐकलं पाहिजे.

# समृद्धी महामार्गावर मारहाण अन् दरोडा!

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**छत्रपती संभाजीनगर :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर सलग घडत असलेल्या लूटमार, वाहनांवर दगडफेक, डिझेल-बॅटरी चोरी, सीसीटीव्ही बंद असणे आणि पोलिस गस्तीच्या अभावाच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या समृद्धी महामार्गावर प्रति किलोमीटर २ रुपयांहून अधिक टोल आकारला जात असताना प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी का मिळत नाही, असा थेट सवाल दानवे यांनी उपस्थित केला आहे. दानवे यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून समृद्धी महामार्गावरील कथित गैरव्यवस्था आणि सुरक्षेतील त्रुटींची १२ मुद्द्यांमध्ये मांडणी केली. महामार्गावर १८ लाख रुपयांचा दरोडा पडतो, दरोडेखोरांकडून वाहनांचे टायर फोडले जातात आणि त्यानंतर तेच टायर बदलून देण्याइतपत त्यांची मजल जाते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. याशिवाय पोलिसांची गस्त, सीसीटीव्ही व्यवस्था आणि आपत्कालीन यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# गुप्ता फ्लोअर अँड ऑइल इंडस्ट्रीजमध्ये दरोडा

## व्यापाऱ्याला बांधून मारहाण करत सुमारे ५४ लाखांचा ऐवज लांबवला

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



अकोला: शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नया जीन मोहता मिल रोडवरील 'गुप्ता फ्लोअर अँड ऑइल इंडस्ट्रीज'मध्ये घरच्याच हमालाने साथीदारांसह मिळून दरोडा टाकल्याची खळबळजनक घटना घडली आहे. दरोडेखोरांनी कारखान्याचे मालक आणि प्रसिद्ध व्यापारी विजय रामकरण गुप्ता यांना दोरीने बांधून, मारहाण करत सुमारे ५४ लाखांचे सोने व रोख रक्कम लंपास केली. विजय गुप्ता हे सकाळी ६ वाजता कारखान्यात आले असता, गेल्या चार-पाच वर्षांपासून कामावर असलेल्या हमालाने काही दिवसांपूर्वी सोबत आणलेल्या एका नवीन सहकाऱ्याला घेऊन काम सुरू केले होते.

सकाळी ७:१५ वाजेच्या सुमारास गुप्ता हे खाली उतरून कामगारांना सूचना देण्यासाठी गेले असता, तिसरा अज्ञात इसम मागच्या दाराने आत शिरला. चोरट्यांनी अचानक गुप्ता यांच्यावर हल्ला करून त्यांचे हात-पाय दोरीने बांधले आणि मारहाण केली.प्राथमिक माहितीनुसार, जुना हमाल, त्याने सोबत आणलेला नवीन व्यक्ती आणि मागून आलेला तिसरा इसम—या तिघांनी संगनमत करून हा दरोडा आखला होता. दरोडेखोरांनी कारखान्यातील तिजोरी फोडून आणि घरून आणलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा लाखो रुपयांचा ऐवज लांबवला, यात तिजोरीतील रोख रक्कम२.५ लाख, पत्नीचे रोख पैसे १.५ लाख, सोन्याचे दागिने सुमारे ५० लाख किमतीचे असे एकूण ५४ लाखांचा मुद्देमाल लंपास केल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेचे पथक , ठसेतज्ज्ञ आणि श्वानपथक घटनास्थळी दाखल झाले आहेत. फरार हमाल व त्याच्या साथीदारांचा शोध घेण्यासाठी पोलीस विविध भागात पथके रवाना करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

शहर पोलीस स्टेशन हद्दीतील मोहता मिल रोडवरील 'गुप्ता फ्लोअर अँड ऑइल इंडस्ट्रीज'मध्ये दरोड्याची एक थरारक आणि गंभीर घटना घडली आहे. प्रसिद्ध व्यापारी विजय रामकरण गुप्ता यांना दोरीने बांधून आणि जीवे मारण्याची धमकी देऊन अज्ञात भामट्यांनी तब्बल ५४ लाख रुपयांचा ऐवज लांबवला.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस अधिकारी आणि गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. ठसेतज्ज्ञ आणि श्वानपथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले आहे. परिसरातील आणि मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलीस तपासत आहेत. आरोपींचा शोध घेण्यासाठी शहरातून बाहेर जाणाऱ्या मार्गांवर आहे. या घटनेमुळे अकोल्यातील व्यापारी वर्गात प्रचंड घबराट पसरली.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

२

सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# भारत जागतिक समन्वयित वेळेपेक्षा 5 तास 30 मिनिटे पुढे!

## आजच्या दिवशी झाली होती प्रमाण वेळेची निश्चिती

भारताची प्रमाणव्‌ळ ही जागतिक समन्वित वेळेपेक्षा ५ तास ३० मिनिटे पुढे आहे. संपूर्ण वर्षाकरिता हा फरक कायम असतो. ही वेळ प्रयागराज वेधशाळेत मोजली जाते. इतर देशांप्रमाणे ऋतूनुसार या वेळेत बदल केला जात नाही. पण १९४१-४५ च्या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी असा बदल करण्यात आला होता.

ही वेळ ८२.५ अंश पूर्व या रेखांशावर असलेली स्थानिक वेळ आहे. प्रयागराज शहराजवळील मिर्झापूर गावाच्या पश्चिमेला हा रेखांश आहे. मिर्झापूर आणि इंग्लंडमधील रॉयल ऑब्झरव्हेटरी (ग्रीनविच) यांच्या वेळांत रेखांशानुसार साडेपाच तासाचा फरक आहे. राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा दिल्ली येथे आधुनिक उपकरणांचा वापर करून अधिकृत वेळ मोजली जाते. पूर्वी हे काम कुलाबा वेधशाळा करीत असे. १५ एप्रिल २००६ पासून श्रीलंकेने भारतीय प्रमाणवेळ वापरणे सुरू केले. पाकिस्तानची प्रमाणवेळ भारतीय प्रमाणवेळेपेक्षा अर्धा तास अलीकडची आहे. ३१ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताची प्रमाणवेळ अधिकृतपणे निश्चित करण्यात आली. भारताची प्रमाणवेळ जागतिक समन्वित वेळेपेक्षा ५ तास ३० मिनिटे पुढे आहे. ही वेळ उत्तर प्रदेशमधील प्रयागराज (अलाहाबाद) जवळील नैनी शहरावरून जाणाऱ्या ८२.५ अंश पूर्व रेखावृत्तावरून ठरवली जाते. देशात रेल्वे, बँक व इतर अधिकृत व्यवहारांमध्ये एकसूत्रता राहावी म्हणून संपूर्ण देशात ही एकच वेळ पाळली जाते. त्यामुळे 'एक देश एक वेळ' या नियम लागू करण्यात आला आहे. पृथ्वीला १ अंश फिरण्यासाठी ४ मिनिटे लागतात. यामुळे वेगवेगळ्या रेखावृत्तांवर स्थानिक वेळ बदलते. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्थानिक वेळा असू नयेत, म्हणून देशाच्या मध्यभागातून जाणाऱ्या एका रेखावृत्ताला प्रमाण रेखावृत्त मानले जाते. ८२.५ अंश पूर्व रेखावृत्त हे रेखावृत्त भारताच्या साधारण मध्यभागातून (प्रयागराज जवळील मिर्झापूर/नैनी) जाते. त्यामुळे याला भारताचे प्रमाण रेखावृत्त मानले गेले आहे. भारताचा पूर्व-पश्चिम विस्तार सुमारे २,९३३ किलोमीटर आहे. यामुळे गुजरात (पश्चिम) आणि अरुणाचल प्रदेश (पूर्व) यांच्या स्थानिक वेळेत जवळपास २ तासांचा फरक पडतो. ईशान्य भारतातील राज्यांमध्ये सूर्य लवकर मावळतो. त्यामुळे तिथे कामाचे तास वाया जाऊ नयेत म्हणून स्वतंत्र प्रमाणवेळेची मागणी केली जाते. ब्रिटिश काळात चहाच्या बागांमध्ये अशी वेगळी वेळ पाळली जात असे.

---

### भारतातील दोन तासांच्या वेळेच्या फरकाचे परिणाम!

भारतातील दोन तासांच्या वेळेच्या फरकाचे परिणाम भारताच्या पूर्व (अरुणाचल प्रदेश) आणि पश्चिम (गुजरात) टोकांमध्ये सुमारे २ तासांचा नैसर्गिक फरक आहे. देशात एकच प्रमाणवेळ असल्याने याचे खालील परिणाम होतात

१) ऊर्जेचा अपव्यय: ईशान्य भारतात सूर्य लवकर मावळतो. परंतु, सरकारी कार्यालये आणि शाळा दिल्लीच्या वेळेनुसार उशिरापर्यंत सुरू राहतात. यामुळे तिथे संध्याकाळी जास्त वीज वापरावी लागते.

२) कार्यक्षमतेवर परिणाम : ईशान्येतील लोकांचा दिवस पहाटे ४ वाजताच सुरू होतो, पण कार्यालये सकाळी १० वाजता उघडतात. यामुळे त्यांच्या जैविक घड्याळावर आणि कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो.

३) चहा बाग वेळेची मागणी : आसाममधील चहाच्या बागांमध्ये आजही ब्रिटीशकालीन 'चहा बाग वेळ' (आयएसटीपेक्षा १ तास पुढे) वापरली जाते, जेणेकरून दिवसाच्या प्रकाशाचा पुरेपूर वापर करता येईल.

---

### इतर देशांमध्ये एकापेक्षा जास्त प्रमाणवेळा का?

जगातील अनेक देशांमध्ये एकापेक्षा जास्त प्रमाणवेळा असण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा प्रचंड पूर्व-पश्चिम विस्तार होय. ज्या देशांचा आडवा (पूर्व-पश्चिम) विस्तार खूप मोठा असतो, तिथे एका टोकाला दुपार असताना दुसऱ्या टोकाला मध्यरात्र असू शकते. अशा वेळी संपूर्ण देशात एकच वेळ ठेवणे अशक्य होते. १) उदाहरणे (रशिया) : रशिया हा जगातील सर्वात मोठा देश असून तिथे ११ वेगवेगळ्या प्रमाणवेळा आहेत.

२) अमेरिका व कॅनडा : या देशांमध्ये अनुक्रमे ६ आणि ६ मुख्य प्रमाणवेळा आहेत. प्रशासकीय सोय: रेल्वे, विमाने आणि स्थानिक लोकांचे दैनंदिन व्यवहार सूर्योदयाशी सुसंगत राहावेत, म्हणून हे देश एकापेक्षा जास्त टाइम झोन वापरतात.

---

### भारतात दोन टाइम झोन लागू करण्याचे फायदे-तोटे!

ईशान्य भारतातील राज्यांकडून अनेक वर्षांपासून स्वतंत्र टाइम झोनची मागणी केली जात आहे. शास्त्रज्ञांनी यासाठी ८९ अंश ५२ पूर्व रेखावृत्ताची शिफारस केली आहे, जी सध्याच्या वेळेपेक्षा १ तास पुढे असेल.

**फायदे :**

१) ऊर्जेची मोठी बचत: ईशान्य भारतात सूर्य लवकर मावळतो. वेळेत बदल केल्यास दिवसाच्या प्रकाशाचा चांगला वापर होईल आणि दरवर्षी अब्जावधी युनिट विजेची बचत होईल.




२) कार्यक्षमता वाढेल: लोकांचे दैनंदिन वेळापत्रक निसर्गाच्या चक्राशी (सूर्योदय-सूर्यास्त) जुळेल, ज्यामुळे त्यांची शारीरिक कार्यक्षमता आणि आरोग्य सुधारेल.

३) आर्थिक फायदा: कार्यालये आणि कारखाने लवकर सुरू होऊन लवकर बंद झाल्यामुळे उत्पादकता वाढेल.

तोटे आणि आव्हाने :

१) रेल्वे अपघात आणि गोंधळ : भारतात रेल्वेचे जाळे प्रचंड मोठे आहे. दोन वेगवेगळ्या वेळेमुळे गाड्यांच्या वेळापत्रकात मोठा गोंधळ उडू शकतो आणि सिग्नलिंगच्या चुकीमुळे अपघातांचा धोका वाढू शकतो. २) प्रशासकीय अडचणी: बँक व्यवहार, सरकारी कार्यालये, विमानांची उड्डाणे आणि इतर डिजिटल सेवांच्या समन्वयात अडचणी येतील. ३) सामाजिक दरी: देशात दोन वेगवेगळे टाइम झोन केल्यास ईशान्य भारत मुख्य भूमीपासून राजकीय किंवा सामाजिक दृष्ट्या वेगळा पडल्याची भावना निर्माण होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जाते.

---

### जगात सर्वाधिक टाइम झोन असलेला फ्रान्स!

जगातील सर्वात जास्त टाइम झोन असलेला देश फ्रान्स हा आहे. फ्रान्समध्ये एकूण १२ टाइम झोन आहेत (काही नोंदींनुसार अंटार्क्टिकामधील दाव्यांसह १३). कारण फ्रान्सचा मुख्य भूभाग युरोपमध्ये छोटा असला, तरी जगाच्या वेगवेगळ्या महासागरांमध्ये (पॅसिफिक, अटलांटिक, हिंदी महासागर) फ्रान्सच्या मालकीची अनेक बेटे आणि परदेशी प्रांत आहेत. या सर्व विखुरलेल्या भागांमुळे फ्रान्समध्ये सर्वाधिक टाइम झोन आहेत. या यादीत रशिया आणि अमेरिका अनुक्रमे दुसऱ्या स्थानावर आहेत.

# कळस उंचावला; पण ज्ञानाचा पाया कुठे?

सुप्रसिद्ध मराठी गझलकार गोपाल मापारी यांच्या गजलेतील या ओळी समाजाच्या मानसिकतेवर नेमके बोट ठेवणाऱ्या आहेत.... "उंच शाळेहून देवाचा कळस आहे, कळस आहे,मात्र शाळेचा खडूसाठी नवस आहे, कळस आहे." या दोन ओळींमध्ये केवळ देव, देवालय आणि शाळा यांची तुलना नाही; तर आपल्या समाजाच्या प्राधान्यक्रमातील विसंगतीवर अत्यंत उपरोधिक भाष्य आहे. देवळाचा कळस उंच असावा, भव्य असावा, सुवर्णमंडित असावा, अशी समाजाची इच्छा असते; पण त्याच समाजाला ज्ञानाच्या मंदिराचा—शाळेचा—पाया किती मजबूत आहे, याची तितकीशी चिंता नसते. हीच खरी शोकांतिका आहेदेवाच्या कळसासाठी आपण देणग्या देतो; पण शाळेच्या खडूसाठी नवस करावा लागतो, ही विसंगती गोपाल मापारी यांनी अत्यंत नेमक्या प्रतिमेत पकडली आहे. येथे 'खडू' हे केवळ वर्गात लिहिण्याचे साधन नाही. तो शिक्षणाचा, ज्ञानप्रक्रियेचा, शिक्षकाच्या श्रमाचा आणि विद्यार्थ्यांच्या 'भविष्याचा प्रतीक' आहे. ज्या समाजात देवळाच्या कळसासाठी संपत्ती सहज उपलब्ध होते, पण मुलांच्या शिक्षणासाठी मूलभूत साधनांचीही वानवा असते, त्या समाजाच्या विकासाचा कळस कितीही उंच असला तरी त्याचा पाया कमकुवतच राहणार. या ओळीतील 'कळस' शब्दाची पुनरावृत्ती विशेष अर्थपूर्ण आहे. एका बाजूला दगडाचा, धातूचा, धार्मिक श्रद्धेचा कळस; तर दुसऱ्या बाजूला ज्ञानाचा कळस. कवीचा प्रश्न जणू असा आहे—आपण आकाशाकडे बोट दाखवणारे कळस उंच करतो; पण मुलांच्या भवितव्याला उंचावणारी शाळा का दुर्लक्षित ठेवतो? खरे तर शाळाही एक प्रकारचे मंदिरच आहे. देवळात आपण देव शोधतो; शाळेत माणूस घडवतो. देवळाचा कळस उंचावणे हे श्रद्धेचे लक्षण असेल; पण शाळेचा खडू टिकवणे हे समाजाच्या विवेकाचे लक्षण आहे. कळसाची उंची नव्हे, तर ज्ञानाची उंची राष्ट्राचे भविष्य ठरवते, हा या गजलेतील ओळींचा गहिरा आशय आहे.म्हणूनच गोपाल मापारी यांचा हा शेर केवळ उपरोध नाही; तो समाजाच्या 'विवेकाला' विचारलेला एक अस्वस्थ करणारा प्रश्न आहे— देवाचा कळस उंचावणाऱ्या हातांनी कधीतरी शाळेतील खडूही उचलला पाहिजे; कारण कळस देवळाला शोभा देतो, पण खडू समाजाला भविष्य देतो!



-प्रा. डॉ. सुहास उगले, अकोला

# शिवाजी सावंत एक 'युगंधर' साहित्यिक

## आज शिवाजी सावंत यांची जयंती

समकालीन जीवनाची रूपे साहित्यातून मांडणे तुलनेने सोपे असते. पण जो काळ पूर्वसुरींच्या अभिजात साहित्यकृतीतून आणि इतिहासाच्या पानापानांतून धुक्याचे अनेक पदर लपेटून उभा आहे, तो वाचकांसमोर उभा करणे हे मोठे आव्हान असते. ते शिवाजी सावंत यांनी समर्थपणे पेलले म्हणूनच ते 'युगंधर' साहित्यिक आहेत. मानवी इतिहासातील महापुरुषांच्या सामर्थ्यांचा आणि मर्यादांचा वेध घेण्याची क्षमता या चिंतनशील साहित्यिकांत होती.




मराठी कादंबऱ्यांमध्ये मानदंड मानल्या जाणाऱ्या 'मृत्यूंजय' या पौराणिक कादंबरीचे लेखक शिवाजी सावंत यांचा आज स्मृतिदिन. मराठी साहित्यात त्यांनी एकापेक्षा एक सरस साहित्यनिर्मिती केली. ३१ ऑगस्ट १९४० रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात शिवाजी सावंत यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजऱ्यात पार पडले. त्यानंतर त्यांनी कोल्हापूरमध्ये बी.ए.चे प्रथम वर्ष पूर्ण केले. बीए प्रथम वर्षानंतर शिवाजी सावंत वाणिज्य शाखेकडे वळले. त्यांनी वाणिज्य शाखेतील (जीसीडी) पदविका घेतली. पुढे टायपिंग, शॉर्टहँडचा कोर्स पूर्ण करून त्यांनी न्यायालयात लघूलेखनाची नोकरी मिळवली. या नोकरीनंतर १९६२ ते १९७४ या कालावधीत त्यांनी कोल्हापूरमधील राजाराम प्रशालेत शिक्षक म्हणून जबाबदारी घेतली. कोल्हापूरनंतर शिवाजी सावंत पुण्यात स्थायिक झाले. १९७४ ते १९८० अशी सहा वर्षे त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाच्या 'लोकशिक्षण' मासिकात सहसंपादक म्हणून कार्य केले. थोड्याच वेळात ते या मासिकाचे संपादक झाले. १९८३ मध्ये शिवाजी सावंत यांनी स्वेच्छानिवृत्ती घेत पुढील आयुष्यात केवळ लेखनच करण्यावर लक्ष केंद्रित केले. दरम्यान, १९८३ रोजी बडोदा येथे भरलेल्या 'बडोदे मराठी साहित्य संमेलनाचे' त्यांनी अध्यक्षपद भूषवले.

१९६७ मध्ये लेखक शिवाजी सावंत लिखित 'मृत्यूंजय' ही पौराणिक कादंबरी प्रकाशित झाली. महाभारतातील महत्त्वपूर्ण प्रमुख पात्रांपैकी एक म्हणजे कर्ण. महाभारतात कौरवांना साथ दिलेल्या कर्णाच्या दानशूर, असामान्य व्यक्तिमत्वाचा मागोवा शिवाजी सावंत यांनी या कादंबरीत घेतला आहे. या कादंबरीच्या लेखनासाठी शिवाजी सावंत यांनी थेट कुरुक्षेत्र गाठले. तिथे मुक्काम ठोकला. प्रदीर्घ संशोधन, चिंतन आणि मनन यातून त्यांनी 'मृत्यूंजय' सारखी रससंपन्न वास्तववादी कादंबरी वाचकांपुढे ठेवली. या कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखक शिवाजी सावंत यांनी हिंदीतील केदारनाथ मिश्र ह्यांचे 'कर्ण' आणि रामधारी सिंह दिनकर यांचे 'रश्मिरथी' या दोन खंडकाव्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. या कादंबरीवर आधारित अनेक नाटकं मराठी आणि हिंदी रंगभूमीवर सादर करण्यात आली आहेत. 'मृत्यूंजय' मधील लेखक शिवाजी सावंत यांच्या कसदार मराठी लिखाणाची दखल भारतीय ज्ञानपीठ संस्थेनेसुद्धा घेतली. त्यानुसार २४ सप्टेंबर १९९५ रोजी या कादंबरीला भारतीय ज्ञानपीठ संस्थेचा 'मूर्तिदेवी' पुरस्कार देऊन लेखक शिवाजी सावंत यांना सन्मानित करण्यात आले. 'मृत्यूंजय' नंतर सावंतांनी 'छावा' ही ऐतिहासिक तर 'युगंधर' ही पौराणिक विषयावर आधारित कादंबरी लिहिली. 'युगंधर' ही महाकादंबरी भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारलेली आहे. सावंत यांची अमेरिकास्थित कन्या कादंबिनी यांनी 'युगंधर' या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद केला आहे. शिवाजी सावंत यांच्या 'युगंधर' या कादंबरी प्रमाणेच त्यांची अन्य पुस्तकं इंग्रजी भाषेत अनुवादित झाली आहेत. 'मृत्यूंजय' आणि 'छावा' या पौराणिक, ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या लेखनासाठी सावंत यांनी पोथ्या, हस्तलिखितं, कागदपत्रे आणि पुराणकालीन स्थळांना भेटी दिल्या. ही सामग्री आणि लेखनाची अनोखी शैली यांच्या आधारे लेखक शिवाजी सावंत यांनी दमदार, वाचनीय साहित्यकृतींची निर्मिती केली. लेखक शिवाजी सावंत यांचे 'अशी मने असे नमुने' (व्यक्तिचित्रे – १९७५), कवडसे (ललित निबंध), कांचनकण (ललित निबंध), छावा (छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कादंबरी – १९७९), छावा (नाट्यरूपांतर), पुरुषोत्तमनामा, मृत्यूंजय (महारथी कर्णाच्या जीवनावरील कादंबरी – १९६७), मृत्यूंजय (नाट्यरूपांतर), मोरावळा (व्यक्तिचित्रे – १९९८), युगंधर (भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरील कादंबरी – २०००), युगंधर श्रीकृष्ण – एक चिंतन, लढत (सहकारमहर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र, दोन भागांत – १९८६), शेलका साज (ललित निबंध – १९९४), संघर्ष (कामगार नेते मनोहर कोतवाल यांचे चरित्र – १९९५) ही साहित्य प्रसिद्ध आहेत. शिवाजी सावंत यांना 'मृत्यूंजय' आणि 'छावा' या कादंबऱ्यांसाठी विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. कऱ्हाड येथील ७६ व्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या' अध्यक्षपदाचे ते उमेदवार होते. आपल्या उमेदवारीच्या प्रचारासाठी गोव्यात गेले असताना मडगाव येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने १८ सप्टेंबर २००२ रोजी 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांचे निधन झाले.

कुरुक्षेत्रावरून आवश्यक संदर्भ गोळा करून परत आल्यानंतर सावंतांनी तीन महिन्यांत पंधराशे पानांचे हस्तलिखित लिहून पूर्ण केले. अनेक प्रकाशकांच्या भेटी घेतल्या. या नवोदित लेखकाची 'मृत्युंजय' ही पहिली महाकादंबरी प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्रातील एकही प्रकाशक तयार नव्हता. शिवाजीराव पुण्यात येऊन ग.दि. माडगूळकरांना भेटले. त्यांनी ती कादंबरी वाचून कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचे अनंतराव कुलकर्णी यांना या कादंबरीच्या प्रकाशनासंदर्भात फोनवरून सांगितले. अनंतरावांनी गदिमांच्या सांगण्यानुसार कादंबरी वाचली आणि प्रकाशित करण्याचे ठरविले. गदिमांच्या हस्ते घरगुती पूजनानंतर 'मृत्युंजय' ही कादंबरी प्रकाशित झाली. कादंबरीला अनेक मानाच्या पुरस्कारांसह भारतीय ज्ञानपीठाचा मूर्तिदेवी पुरस्कार मिळाला. नोबेल पुरस्कारासाठी कोलकत्त्याहून १९९० साली मराठीतील पहिले नामांकन 'मृत्युंजय'ला मिळाले. हिंदी, इंग्लिश, कन्नड, गुजराती, उडिया, मल्याळम, बंगाली, तेलगु, राजस्थानी अशा दहा भाषांत अनुवादित झालेली कादंबरी आजही खपाचे विक्रम करीत आहे.

# अमरावती विद्यापीठाची पुनर्मूल्यांकन पद्धत विद्यार्थ्यांसाठी घातक?

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस असंतोष वाढत असल्याचे चित्र आहे. परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्यानंतर पुनर्मूल्यांकनाच्या माध्यमातून न्याय मिळेल, या अपेक्षेने विद्यार्थी अर्ज करतात. मात्र, पुनर्मूल्यांकनासाठी आकारले जाणारे शुल्क, प्रक्रियेस लागणारा वेळ आणि निकालातील कथित विसंगती यामुळे विशेषतः ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक तसेच मानसिक तणावाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून होत आहे. काही विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, मूळ निकालात अत्यल्प किंवा शून्य गुण मिळाल्यानंतर पुनर्मूल्यांकनात मोठ्या प्रमाणात गुण वाढल्याची उदाहरणे आहेत. तर काही प्रकरणांत पुनर्मूल्यांकनानंतर मिळालेले गुण कमी झाल्याचा आरोपही विद्यार्थी करत आहेत. त्यामुळे मूल्यांकनाची पद्धत नेमकी किती पारदर्शक आहे? उत्तरपत्रिकांची तपासणी आणि पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया कोणत्या निकषांनुसार केली जाते? असा सवाल उपस्थित होत आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी मोलमजुरी करून परीक्षा शुल्क भरतात. कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी गुण मिळाल्यास पुनर्मूल्यांकनासाठी पुन्हा वाढीव शुल्क भरावे लागते. त्यामुळे आर्थिक अडचणी अधिक वाढतात. कमी गुणांमुळे पुढील शिक्षण, प्रवेश प्रक्रिया आणि रोजगाराच्या संधींवर परिणाम होण्याची भीतीही विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत आहे. विशेष म्हणजे एलएलबी , एलएलएम सारख्या अभ्यासक्रमात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनाही मूल्यांकनाबाबत अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे विद्यार्थी सांगतात. त्यामुळे केवळ अभ्यासात कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांचीच समस्या नसून गुणवंत विद्यार्थ्यांनाही या प्रक्रियेबाबत प्रश्न पडत असल्याचे चित्र आहे. काही विद्यार्थी व पालकांनी उत्तरपत्रिका तपासणीच्या गुणवत्तेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले असून, "उत्तरपत्रिका तपासणाऱ्या शिक्षकांकडून योग्य दक्षता घेतली जाते का?" असा सवाल केला आहे. मात्र, तपासणी करणारे शिक्षक मद्यपान करून पेपर तपासतात, हा आरोप सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे व अधिकृत चौकशी आवश्यक आहे. विद्यार्थी संघटनांकडे पुनर्मूल्यांकनातील कथित विसंगतींचे पुरावे असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रियेची पारदर्शकता स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे. विद्यापीठाने पुनर्मूल्यांकन शुल्काचा पुनर्विचार करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना सवलत द्यावी, उत्तरपत्रिकांच्या तपासणीसाठी काटेकोर गुणवत्ता नियंत्रण व्यवस्था निर्माण करावी आणि पुनर्मूल्यांकनाचा निकाल निश्चित कालमर्यादेत जाहीर करावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे विद्यापीठ प्रशासनाने संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे.




अँड पंकज सुरेश पोहरे
पातूर, मो. 8855995792



एका महिला भक्ताने कावडीने जल आणून राजराजेश्वराला अभिषेक केला.

# जिप इमारत दुरुस्तीच्या नावावर ताडपत्रीचे आच्छादन

## पीआरसी भेटी पूर्वी थातूरमातूर कामे, आरोप

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अकोला:** जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कार्यालयात दुरुस्तीच्या नावाने थातूरमातूर कामे, कार्यालयात एसी, छताला मात्र गळती, जिल्हा परिषदच्या प्रशासकीय इमारतीची दयनीय अवस्था आहे. पंचायत राज समितीने सर्वप्रथम जिल्हा परिषद इमारतीच्या दुरुस्तीचा खर्चाचा हिशोब घेणे नितांत गरजेचे आहे अशी मागणी आगाखान पठाण यांनी केली आहे.



मिनी मंत्रालय म्हणून जिल्हा परिषदला पाहिल्या जाते. गावातील विविध सर्कलमध्ये कोट्यावधीचा निधी जिल्हा परिषद सदस्य मार्फत मंजूर होऊन खर्च केला जातो. आज रोजी जिल्हा परिषद बरखास्त असल्याने कारभार प्रशासक म्हणून जिल्हा परिषद सीईओ पाहत आहेत. परंतु इमारतीच्या दूरवस्थाकडे सीईओ यांनी पाठ फिरवल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. थातूरमातूर दुरुस्ती करून निधीचा दुरुपयोग केला जात आहे असे इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाकडे पाहून समजते. दुरुस्तीच्या नावाने निधी कुठे मुरत आहे हे पंचायत राज समितीने चौकशी केली तर समोर येणार आहे. याकडेच जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.

निधीचा दुरुपयोग झाला असेल तर दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे गरजेचे झाले आहे. इमारत दुरुस्तीच्या नावाने आज रोजी इमारतीच्या छताला चक्क ताडपत्री झाकून पाण्यापासून बचाव करण्याचे अनोखे संशोधन सर्वांना आश्चर्यचकित करणारे आहे.

प्रशासकीय इमारत एसी बसवला परंतु इमारतीची दूरवस्था झालेली आहे. पाण्याचा बचाव करण्यासाठी चक्क छतावर ताडपत्री आधार घेतला आहे एकीकडे जिल्ह्यात विकास कामासाठी कोट्यवादीचा निधी देणाऱ्या जिल्हा परिषद च्या प्रशासकीय इमारतीची दूर अवस्था झालेली आहे. पावसाच्या पाण्यामुळे कार्यालयातील संगणक, तसेच महत्त्वाचे फायली, महत्त्वाची उपकरणे खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हा परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष दिसते. इमारतीची योग्य दुरुस्ती करण्याची नितांत गरज आहे. आता याकडे पंचायत राज समिती काय कारवाई करते याकडे जिल्हा वासियांचे लक्ष लागले आहे.

# उरळ पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी चोरट्यांचा धुमाकूळ

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**हातरूण:** उरळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत काही दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी पशुधन चोरीच्या घटनाही घडत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ग्राम लोहारा गावातील घरांसमोरून दुचाकी चोरी झाली. राजू सहदेव कांबळे यांची एम एच ३० एआर ९४२५ क्रमांकाची गाडी चोरी झाली. उरळ पोलिस स्टेशनला घटनेची नोंद करण्यात आली. दुकानांसमोर किंवा सार्वजनिक ठिकाणी उभ्या केलेल्या दुचाकींवर चोरट्यांची नजर असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. रात्रीच्या वेळी परिसरात शांतता असताना चोरीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पोलिसांनी अधिक गस्त वाढवावी, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी उरळ पोलीस ठाणे हद्दीतील प्रमुख चौक, गावांचे प्रवेशमार्ग, फाटे, बाजारपेठा आणि संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. कॅमेरे बसविल्यास संशयास्पद व्यक्ती आणि वाहनांच्या हालचालींवर नजर ठेवणे शक्य होणार असून, चोरीची घटना घडल्यानंतर तपासासाठीही मदत मिळू शकते.

# माँ क्षिप्रा आणि नर्मदा नदीच्या पवित्र जलाने श्री राजराजेश्वर महाराजांचा जलाभिषेक

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अकोला :** उजैन येथील माँ क्षिप्रा आणि ओंकारेश्वर येथील माँ नर्मदा नदीचे पवित्र जल कावडीमध्ये भरून ११ दिवसांची यात्रा पूर्ण करत राजराजेश्वर नगरीत परतलेल्या शिवभक्त मंडळाने भगवान श्री राजराजेश्वर महाराजांना विधिवत जलाभिषेक केला.



यात्रा पूर्ण झाल्यानंतर शिवभक्तांचे अकोल्यात अत्यंत भक्तिभावाने आगमन झाले. याप्रसंगी भक्तांनी 'हर हर महादेव' आणि 'श्री राजराजेश्वर महाराज की जय' अशा जयघोषात पवित्र जल मंदिरात अर्पण केले.

यानंतर माँ क्षिप्रा आणि माँ नर्मदा नदीच्या जलाने श्री राजराजेश्वर महाराजांचा विधिवत जलाभिषेक करण्यात आला. या जलाभिषेकादरम्यान संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता.

११ दिवसांची कठीण आणि श्रद्धेने भरलेली यात्रा पूर्ण करून शिवभक्तांनी भगवान महादेवाच्या चरणी पवित्र नद्यांचे जल अर्पण केले. या धार्मिक आयोजनामुळे राजराजेश्वर नगरी पूर्णपणे शिवमय झाली होती.

# आदर्श कन्या विद्यालयात गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळा

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**मूर्तिजापूर:** स्थानिक आदर्श कन्या विद्यालय व कला कनिष्ठ महाविद्यालयात 29 ऑगस्टला स्काऊट गाईड मुर्तीजापुर गिल्डच्या वतीने पर्यावरण पूरक,शाडू मातीपासून गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचा उद्देश, पर्यावरण रक्षणाचा असून.मोठ्या प्रमाणावर पी.ओ.पी.पासून तयार होणाऱ्या मूर्तीचा वापर कमी होऊन,पर्यावरणाला साथ देणारे शाडू माती यापासून बनवलेल्या मूर्ती लोकांनी वापरावव्या हाच उद्देश.




प्रशिक्षक ,प्रकाश निरखे, चंदन अग्रवाल, यांनी कार्यशाळेच्या माध्यमातून मूर्ती कशी साकार करावी ,नैसर्गिक रित्या रंगलेपण कसे करावे याबद्दल माहिती सांगितली व मूर्तीचे प्रात्यक्षिक दाखवले. प्रभारी मुख्याध्यापक प्रमोद पोळकट यांनी पर्यावरणाच्या रक्षणाकरीता सर्वांनी एकत्र यावे ,मातीपासूनच बनवलेली श्रीगणेश घरी विराजमान करू असे आवाहन केले. यावेळी पत्रकार देशपांडे,भारती, संत गाडगे बाबा कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका भावना कडू उपस्थित होत्या.या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यांच्या शंकांचे,समाधान करण्यात आले. आभार प्रदर्शन सचिन काटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता शीला सरोदे, पूजा मारवाल, राष्ट्रपाल गायकवाड सर वैष्णवी डवंगे ,वैष्णवी जोगी,गोविंद आजळकर, संगीताताई खोत यांनी परिश्रम घेतले.

# खाटू श्याम बाबांच्या चरणी चांदीचा निशान अर्पण

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** प्रभाग क्रमांक ९ मधून नगरसेवक गंप्पु शर्मा आणि माजी उपनगराध्यक्ष लखन अरोरा यांनी आपली बहीण पूजा राजेश अरोरा यांच्या दणदणीत विजयाच्या निमित्ताने केलेला नवस पूर्ण केला. राजस्थान येथील प्रसिद्ध खाटूधाम येथे पोहोचून त्यांनी श्री खाटू श्याम बाबांचे विधिवत दर्शन व पूजन करून त्यांच्या चरणी चांदीचा निशान अर्पण केला.



निवडणुकीत पूजा अरोरा यांना नागरिकांचा उत्स्फूर्त जनसमर्थन मिळत मोठ्या मताधिक्याने विजय प्राप्त झाला. या विजयापूर्वी कुटुंबीयांकडून श्री खाटू श्याम बाबांच्या चरणी मन्नत करण्यात आली होती. विजय मिळाल्यानंतर ही मन्नत पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यानुसार गंप्पु शर्मा व लखन अरोरा यांनी राजस्थानमधील खाटूधाम गाठून श्री श्याम बाबांचे दर्शन घेत चांदीचा निशान अर्पण केला.

यावेळी मंदिरात विधिवत पूजा-अर्चा करून श्री श्याम बाबांकडे शर्मा व अरोरा परिवारासह मूर्तिजापूर शहरातील नागरिकांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली. तसेच पूजा अरोरा यांच्या विजयासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या मतदार, कार्यकर्ते, समर्थक आणि सर्व शुभचिंतकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी अमित नागवान,अप्पु तिड़के, पिंकू शर्मा, सर्वेश लोहिकपुरे, रितेश शर्मा, गुड्डू शर्मा, राम का. जोशी, चेतन नागवान, सुमित अग्रवाल, प्रविण वर्मा, आशिष वर्मा, भूषण कुंदनानी यांच्यासह शर्मा व अरोरा परिवारातील सदस्य आणि समर्थक उपस्थित होते.

# बिलकेश्वराचे भाविकांनी घेतले दर्शन

**हिवरखेड:** तेल्हारा मार्गावर राम नगर मध्ये असलेले बिलकेश्वर महादेव मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

येथे आज, तिसऱ्या श्रावण सोमवारी भक्तांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. हर हर महादेवचा जयघोष करण्यात आला.

तसेच धारगड यात्रे करिता कावडधारी भक्त स्वयंभू महादेव शिवलिंग दर्शनासाठी धारगड रवाना झाले.हर बोला महादेव हर हर महादेव असा गजर करीत शिव भक्तांनी धारगड कडे प्रयाण केले.



# आलेगाव परिसरात पावसासाठी मुस्लिम बांधवांची विशेष नमाज व सामूहिक प्रार्थना

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**आलेगाव :** परिसरात पावसाने ओढ दिल्यामुळे ग्रामस्थ चिंतेत असताना, आज वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी मुस्लिम बांधवांनी एकत्र येत अनवाणी पायी चालत आणि उघड्या डोक्याने विशेष नमाज व सामूहिक प्रार्थना केली.

पावसाने पाठ फिरवल्यामुळे परिसरात भीषण पाणीटंचाई तसेच दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. या संकटातून सुटका व्हावी आणि लवकरात लवकर मुसळधार पाऊस पडावा, यासाठी आलेगाव येथील बद्र मस्जिद येथून मुस्लिम बांधवांनी विशेष प्रार्थनेचे आयोजन केले.



मुख्य मार्गावरून चालत सर्व भाविक नमाजगाव येथे पोहोचले. तेथे सर्वांनी एकत्र येऊन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पावसासाठी विशेष नमाज (नमाज-ए-इस्तिस्का) अदा केली. नमाजनंतर दोन्ही हात पसरून देवाकडे गावात सुख-समृद्धी यावी आणि तात्काळ मुसळधार पाऊस पडावा, यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. या प्रार्थनेची सुरुवात ऐतिहासिक बद्र मस्जिदपासून झाली. देवाचरणी पूर्ण श्रद्धा व्यक्त करण्यासाठी मोहिमेत सहभागी झालेले नागरिक पायात चप्पल न घालता अनवाणी पायाने आणि डोक्यावर टोपी न ठेवता उघड्या डोक्याने मुख्य मार्गावरून नमाजगावच्या दिशेने चालत गेले.

# धार्मिक वातावरणात काशी कवळेश्वर महाराजांची कावड यात्रा उत्साहात

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**पातूर :** पातूर शहरात काशी कवळेश्वर महाराजांच्या कावड यात्रेचे आयोजन अत्यंत भक्तिमय आणि शिस्तबद्ध वातावरणात करण्यात आले. पारंपरिक धार्मिक वेशभूषा धारण केलेल्या भाविकांनी विविध धार्मिक वाद्यांच्या गजरात ही कावड यात्रा काढली.

कावड यात्रेदरम्यान भाविकांनी पातूर शहरातील महादेव मंदिरात जाऊन विधिवत पूजा-अर्चा केली. यावेळी भजन, धार्मिक गीते तसेच पारंपरिक वाद्यांच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. विशेष म्हणजे या यात्रेदरम्यान कोणत्याही प्रकारचा धांगडधिंगा अथवा गैरप्रकार न करता पूर्णपणे धार्मिक आणि पारंपरिक पद्धतीने यात्रा पार पडली.

पातूर तालुक्यातील विविध महादेव मंदिरांमधून पवित्र जल आणून ते काशी कवळेश्वर महाराजांच्या स्थळी अर्पण केले जाते. या निमित्ताने काशी कवळेश्वर येथे मोठ्या धार्मिक जलाभिषेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या परंपरेला अनेक वर्षांची धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असून भाविक मोठ्या श्रद्धेने या यात्रेत सहभागी होतात.

यात्रेत सहभागी भाविकांनी पारंपरिक वेशभूषा धारण करून धार्मिक शिस्तीचे पालन केले. टाळ मृदंग व अन्य पारंपरिक धार्मिक वाद्यांच्या गजरात कावड यात्रा मार्गस्थ झाली. भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेले.

धार्मिक परंपरा आणि सामाजिक शिस्तीचा आदर्श

काशी कवळेश्वर महाराजांची कावड यात्रा ही केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून पातूर तालुक्यातील पारंपरिक संस्कृती आणि धार्मिक एकोप्याचे प्रतीक मानली जाते. कोणताही अनुचित प्रकार न घडवता शांतता, शिस्त आणि भक्तिभावाने यात्रा पार पडल्याने या धार्मिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बोर्डीच्या श्री संत नागास्वामी महाराज प्रकटोत्सवाला २३० वर्षांची परंपरा

पवन बेलसरे ३१ ऑगस्ट

## युवा पिढीची हाताने रथाला ओढण्याची प्रथा आजही कायम

**अकोट :** सातपुड्याच्या पायथ्याशी बोर्डी येथे पुरातन व ऐतिहासिक पौराणिक संत श्री नागास्वामी महाराजांचे मंदिर आहे. बोर्डी गावांमध्ये अंदाजे २३० वर्षांपूर्वी नागास्वामी महाराज (कणोजी ब्राह्मण) श्री रामगिरी गोसावी म्हणून प्रगट झाले. या प्रगट दिन यात्रेलाही दोनसे तीस वर्षांची रथ मिरवणुकीची परंपरा लाभली आहे.

महाराज स्वतः वस्त्रांच्या मोहबंधनातून मुक्त असल्यामुळे 'नागास्वामी' म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध झाले.गावामधीलच एका जुन्या मंदिरात महाराज धुनी लावून बसायचे व अन्नपूर्णा मातेच्या मूर्तीची पूजा, आरती व जप करायचे. महाराजांकडे अनेक असाध्य आजाराचे रुग्ण बर व्हावे, या उद्देशाने यायचे आणी महाराज धुनीमधील अंगारा रुग्णांना द्यायचे व रुग्ण बरे व्हायचे, अशा चमत्कारामुळे



महाराज बोर्डीसह परिसरातील गावांमध्ये प्रसिद्ध झाले. याच काळात एकदा कोरडा दुष्काळ पडला असता जनता हतबल होऊन पर्जन्यवृष्टी होण्यासाठी महाराजांना साकडे घातले. त्याच वेळी

महाराजांनी टाळ वाजवत ईश्वराचा अखंड हरिनाम जप सुरू केला आणि आठव्या दिवशी थो-धो पाऊस कोसळला, अशी आख्यायिका आहे. तेव्हापासून गावकरी त्याच तिथीवर ७ दिवस अखंड टाळ मृदंग वाजवत हरिनाम सप्ताह करतात अन्नदानाचा फार मोठा कार्यक्रम करतात.

महाराजांचे इतरही अनेक चमत्कार दिसायला लागले. असेच एके दिवशी श्रीमान राजे रघूजी भोसले यांची पत्नी श्रीमती बाकाबाई मनात पुत्र प्राप्तीची अपेक्षा ठेवून नागपूरवरुन बोर्डी येथेमहाराजांचे दर्शना करिता येत होती. संत नागास्वामी महाराज अंतर्ज्ञानी असल्यामुळे त्यांना कळून चुकले होते की बाकाबाईच्या नशिबात पुत्रप्राप्ती नाही, त्यामुळे बाकाबाईची निराशा होऊ नये म्हणून महाराजांनी संजीवन समाधी घेतली.आज त्याच ठिकाणी संत नागास्वामी महाराजांचे भव्य ऐतिहासिक व प्राचीनकालीन मंदिर आहे. प्राचीनकालीन सागाचे असून त्यावर कोरीव नक्षीकाम केलेले आहे मंदिराच्या आवारात अन्नपूर्णा मातेचे दुहेरी मंदिर आहे मंदिराच्या गाभाऱ्याची नूतनीकरण झाले असून कलास्थापना सुद्धा झाली आहे मंदिराच्या प्रवेश द्वारा जवळ एका बाजूला संत गजानन महाराज मंदिर तर दुसऱ्या बाजूला संत गाडगेबाबांचे मंदिर आहे श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी धारगड यात्रा भरते सदर यात्रा संपूर्ण विदर्भात प्रचलित आहे पूर्ण नदीसह परिसरातील इतरही नद्यांची पवित्र जल आणून कावड धारी नागवास्वामी महाराज मंदिरातील शिवलिंगावर जलविषयक करतात सातपुड्याच्या कुशीत असलेल्या मोठ्या महादेवालाही पायदळ जंगलात जाऊन कावडदारी जल विषयक जलभीषयक करतात. या रथामध्ये महाराजांच्या पादुका ठेवून दोरखंडाच्या सहाय्याने ओढून युवा वर्ग गाव प्रदक्षिणा पूर्ण करतात. श्रावण महिन्याच्या चारही सोमवारी नागास्वामी महाराज मंदिरात शिवलिंगाला जलभिषेक केला जातो. रथयात्रेला विदर्भातून भजनी मंडळी, वारकरी दिंड्या व शिवभक्त मोठ्या संख्येने येतात. दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तन होऊन रथयात्रेला मोठ्या उत्साहात वाजत गाजत सुरुवात होते.

यात्रेनिमित्त नागास्वामी महाराजांच्या समाधी मंदिराला आकर्षक रंगरंगोटी व लक्षवेधक रोषणाई करण्यात आली आहे. तसेच संस्थानचे २.५ एकर शेत मंदिराल लागूनच असल्याने यामध्ये मंदिर, बोअरवेल हॉल, संकुल, स्वयंपाक गृह आदी बांधकाम झाल् आहे.

## निधन वार्ता

**संगेश वानखडे**

**अकोला:** गायगाव येथील युवा शेतकरी संगेश बाळू वानखडे यांचा सर्पदंशाने मृत्यू झाला. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली आणि मोठा आप्त परिवार आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# १ सप्टेंबरला श्री सिद्धेश्वर महादेवाची पालखी यात्रा

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**आर्णी :** शहरातील श्री सिद्धेश्वर भक्त मंडळाच्या वतीने गेल्या तीन वर्षांची परंपरा जपत यावर्षीही श्री सिद्धेश्वर महादेव पालखी यात्रा व नगरभ्रमण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, १ सप्टेंबर रोजी हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. यंदाच्या पालखी यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे काशी विश्वनाथ धाम येथून विशेषत्वाने पधारलेले विद्वान पंडित. यांच्या हस्ते आर्णी नगरीत प्रथमच भव्य 'गंगा आरती' पार पडणार आहे. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिराला यंदा विविध प्रकारच्या सुगंधी फुलांची आकर्षक सजावट केली जाणार आहे. मिरवणुकीत भगवान महादेवाची भव्य झांकी, बाबा श्री श्यामजींची झांकी आणि बँजो धुमाल पार्टी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेईल. दिवसभर नगरभ्रमण आणि पालखी यात्रेनंतर सायंकाळी ७.३० वाजता भव्य महाआरती आणि काशीच्या पंडितांच्या उपस्थितीत गंगा आरती होईल. आरतीनंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सिद्धेश्वर भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुसद शहरातील अवैध धंदे बंद करा

## शिवसेना शिंदे गटाचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**पुसद :** पुसद शहरातील पुसद शहर पोलीस ठाणे तसेच वसंतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेले अवैध व्यवसाय त्वरित बंद करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस प्रशासनाला लेखी निवेदन देण्यात आले असून, अवैध धंदे कायमस्वरूपी बंद न झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

पुसद शहरात वरली-मटका, जुगार, अवैध गावठी दारू आदी व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. या अवैध व्यवसायांमुळे सर्वसामान्य नागरिक आर्थिकदृष्ट्या अडचणीत येत असून, अनेक गोरगरीब कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याचे निवेदनात म्हटले आहे. काही कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

शहरातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, तसेच हे व्यवसाय केवळ काही दिवस बंद न ठेवता कायमस्वरूपी बंद करण्याच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. संबंधित पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध व्यवसायांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.



अवैध धंदे तातडीने बंद न झाल्यास शिवसेना शिंदे गटाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पुसद शहर पोलीस ठाणे व वसंतनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार या तक्रारीवर काय भूमिका घेतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

निवेदन देताना शिवसेना शहरप्रमुख दीपक शांतीनाथ उखळकर, तालुकाप्रमुख गणेश पागिरे, पुसद विधानसभा समन्वयक संजय सिंह बयास, शहरप्रमुख संतोष धरणे, शहर संघटक अनिल चव्हाण पाटील, शहर समन्वयक अनिल तोंडारे, अल्पसंख्याक शहरप्रमुख राजीक देशमुख, अध्यात्मिक आघाडीचे मनोज कोलेकर, उपशहरप्रमुख बाबुराव पाईकराव, उपशहरप्रमुख अरुण जाधव, प्रभागप्रमुख सुभाष खुडे, प्रभागप्रमुख अशोक नेमाडे, प्रभागप्रमुख रामराव सोनवणे, प्रभागप्रमुख श्यामसिंह ठाकूर, उपतालुकाप्रमुख शैलेश चंदेल, उपतालुकाप्रमुख बाळासाहेब बेंद्रे आदी शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. आता पोलीस प्रशासनाकडून या निवेदनाची दखल घेऊन अवैध व्यवसायांवर कारवाई केली जाते का, याकडे पुसदकरांचे लक्ष लागले आहे.

# औदुंबर नगरीत विराजमान देवाधिदेव सिद्धेश्वर भोलेनाथ

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**उमरखेड :** यवतमाळ जिल्ह्याच्या विदर्भाच्या शेवटच्या टोकावर वसलेल्या उमरखेड शहराची ओळख 'औदुंबर नगरी' म्हणून आहे. शहर परिसरात मोठ्या प्रमाणात औदुंबर वृक्ष आढळत असल्याने ही ओळख रूढ झाली आहे. प्राचीन काळापासून शहराच्या चारही दिशांना विविध मंदिरे असून, श्रावण महिन्यात या मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते.

औदुंबर नगरीच्या परिसरातील डोंगरावर विराजमान असलेले सिद्धेश्वर महादेव मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

श्रावण महिन्यात येथे महिनाभर पारायण, भजन, पूजन व महादेवाच्या स्तुतीचे आयोजन केले जाते. सकाळपासून सायंकाळपर्यंत भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.



विशेष म्हणजे, शहराला नदी नसतानाही उमरखेडवर आजवर जलसंकटाची तीव्र झळ पोहोचली नसल्याची भावना भाविकांमध्ये आहे. नदीकाठी नव्हे, तर डोंगरावरील या पवित्र स्थानी विराजमान असलेले सिद्धेश्वर महादेव भाविकांना आशीर्वाद देत असल्याची श्रद्धा आहे.

श्रावणातील भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर 'हर हर महादेव', 'जय शिवशंभो'च्या जयघोषाने दुमदुमून जात आहे.

# सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस 'अलर्ट मोड'वर

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**दिग्रस:** आगामी श्री गणेशोत्सव, पोळा, तान्हा पोळा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, दुर्गा उत्सव आणि श्रावण मासातील कावड यात्रेच्या पार्श्वभूमीवर दिग्रस पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. सण शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी दिग्रस पोलीस ठाण्यात DJ चालक-मालक, मंडप डेकोरेशन धारक, कावड यात्रा आयोजक आणि गणेश मंडळांची संयुक्त बैठक पार पडली.



दुपारी १२ ते १ या वेळेत झालेल्या या बैठकीत पोलिसांनी सर्वोच्च न्यायालय व पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले. सणांच्या काळात ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवून नियमबाह्य पद्धतीने डिजे साऊंड सिस्टीमचा वापर केल्यास कडक कारवाईचा इशारा देण्यात आला. तसेच, कावड यात्रेदरम्यान शिस्त व सुरक्षेसाठी आयोजकांनी पुरेशा स्वयंसेवकांची नियुक्ती करावी, अशा सूचना देण्यात आल्या. शॉर्टसर्किट टाळण्यासाठी खबरदारीचे निर्देश उत्सवांसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपांमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागण्यासारख्या दुर्घटना टाळण्यासाठी विद्युत वायरिंग अत्यंत सुरक्षित पद्धतीने करण्याचे निर्देश मंडप डेकोरेशन धारकांना देण्यात आले. बैठकीस उपस्थित ३४ DJ चालक, मंडप धारक व कावड यात्रा आयोजकांना कलम १६८ BNSS अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातही बैठकांचा सपाटा ग्रामीण भागात शांतता राखण्यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक पावले उचलली आहेत. लाख रायजी, कांदळी व कलगाव पोलीस चौकी हद्दीत शांतता समिती आणि उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन सूचना देण्यात आल्या असून नोटिसा देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन दिग्रस पोलिसांनी केले आहे.

# एनपीए, गैरप्रकार, नोकरभरतीच्या मुद्द्यावर सभासद आक्रमक

## जि.प. कर्मचारी पतसंस्थेची आमसभा ठरली वादळी; संचालक सभेतून निघून गेल्याचा आरोप

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. क्र. १०९ ची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी वणी येथील शेतकरी भवनात वादळी वातावरणात पार पडली. वाढलेला एनपीए, कथित भ्रष्टाचार, नोकरभरती, संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवरून सभासदांनी संचालक मंडळाला चांगलेच धारेवर धरले. यावेळी संचालक मंडळाने सभा आटोपती घेत सभागृहातून निघून गेल्याचा आरोप संतप्त सभासदांनी केला आहे.

या सभेच्या सुरुवातीलाच काही सभासदांनी काळे कपडे व काळे दुपट्टे परिधान करून संचालक मंडळाचा निषेध केला. हातात निषेधाचे फलक घेत सभासदांनी जोरदार घोषणाबाजी केली. निवडणुकीला अवघे सहा महिने शिल्लक असताना तसेच १७ संचालकांच्या अपात्रतेचे प्रकरण उच्च न्यायालयात सुरू असताना घाईघाईने नोकरभरती करण्यात आल्याचा आरोप सभासदांनी केला.



या भरतीत सुमारे चार कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोपही करण्यात आला. तसेच ७० कोटी रुपयांच्या बोगस ठेवी, सुमारे ५० कोटींचा एनपीए, अपघात विमा प्रकरणातील कमिशन, बोगस नफा, कल्याण निधीतील आठ कोटींचा तोटा, संचालक अग्रीम तसेच अनावश्यक खर्च आदी मुद्द्यांवर सभासदांनी प्रश्न उपस्थित केले. सभासदांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर पूर्ण अहवालाचे वाचन व सर्व विषयांवर चर्चा न करताच अवघ्या नऊ मिनिटांत संचालक मंडळाने सभा सोडल्याचा आरोप करण्यात आला.

### सभासदांनी घेतली प्रति-आमसभा

■ यानंतर सभासदांनी सभागृहातच प्रती-आमसभा घेत संस्थेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आसाराम चव्हाण, अनिल सरताबे, अजय अक्कलवार, प्रवीण राणे, सचिन गायकवाड, शशिकांत खडसे, किसन सिडाम, रविनाश राठोड, मधुकर कोडापे, चित्तरंजन कडू, पुंडलिक पोले, श्रीराम जिद्देवार, रवि राठोड, प्रवीण दरेकर, नंदेश चव्हाण, गजानन मडावी आदी सभासदांनी विविध प्रश्न मांडले. दरम्यान, नोकरभरती रद्द करण्यासह विविध ठराव सभासदांनी मंजूर केले. संचालक मंडळाने सभा संपविण्यासाठी शेवटी राष्ट्रगीताचा आधार घेतल्याचाही आरोप सभासदांनी केला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेतील अंतर्गत संघर्ष या आमसभेतून चव्हाट्यावर आला आहे.

# जि.प.पतसंस्थेच्या सभासदांना दिलासा; १४ टक्के लाभांशाची 'भेट'

## कर्जाच्या व्याजदरातही अर्ध्या टक्क्याची कपात; शिक्षक दिनापासून लाभांश वाटप




प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**यवतमाळ :** जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., यवतमाळच्या सभासदांना त्यांच्या भागभांडवलावर तब्बल १४ टक्के लाभांश देण्याची घोषणा अध्यक्ष महेश सोनेकर यांनी केली. येत्या ५ सप्टेंबरपासून शिक्षक दिनाचे औचित्य साधून मुख्य कार्यालयासह पुसद, वणी, दारव्हा, आर्णी आणि पांढरकवडा शाखांमध्ये लाभांश वाटपाला सुरुवात होणार आहे.

यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा वणी येथील शेतकरी भवनात पार पडली. सभेच्या प्रारंभी शहीद जवान, राजकीय नेते, पुरामुळे मृत्युमुखी पडलेले नागरिक तसेच संस्थेचे दिवंगत सभासद व ठेवीदार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विषयपत्रिकेवरील ११ विषयांवर चर्चा होऊन सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला ५ कोटी ३३ लाख ९३ हजार ९३२ रुपयांचा निव्वळ नफा झाला. त्यातून १४ टक्के दराने ५ कोटी २ लाख ६४ हजार रुपयांचा लाभांश सभासदांना देण्यात येणार आहे. लाभांश वितरणासाठी सभासदांनी आपला स्थानिक पत्ता आणि मोबाइल क्रमांक संस्थेकडे अद्ययावत करावा, असे आवाहन करण्यात आले. कर्जाच्या व्याजदरात अर्ध्या टक्क्याची कपात केली आहे. त्यामुळे आता गृहकर्ज ९ टक्के, तर मालमत्ता तारण कर्ज १० टक्के व्याजदराने उपलब्ध होणार आहे. सभासदांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून संस्थेचे कामकाज सुरू असून, सभासदांनी संस्थेशी जोडले राहावे, असे आवाहन अध्यक्ष सोनेकर यांनी केले. सभेचे अहवाल वाचन सचिव मंगेश विहाडे यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष संजय गावंडे यांच्यासह संचालक मंडळातील सदस्य, पदाधिकारी, सभासद उपस्थित होते. यावेळी कर्करोगग्रस्त रुग्णांना मदतीचा हात देणारे समाजसेवक प्रा. सतीश मुस्कुंदे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन विशेष नागरी सत्कार करण्यात आला.

### २८ कुटुंबांना २.२८ कोटींचा आधार

■ संस्थेच्या कुटुंब आधार योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये मृत्यू झालेल्या २८ सभासदांच्या वारसांना २ कोटी २८ लाख रुपयांची मदत देण्यात आली. सभासदांच्या कुटुंबांना आर्थिक सुरक्षा देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची ठरत आहे.

### २३७ कोटींचे कर्जवाटप

■ संस्थेचे सभासद भागभांडवल ३३ कोटी ९६ लाख रुपये, गुंतवणूक १८८ कोटी रुपये, तर सभासदांना वितरित केलेले कर्ज २३७ कोटी १० लाख रुपये आहे. संस्थेकडे ४२ कोटी १५ लाख रुपयांचा राखीव निधी असून, ५० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज एका दिवसात देण्याची सुविधा असल्याचे सभेत सांगण्यात आले.

# मासक्षमणाची अनुपम तपश्चर्या; निकिता दुगड यांचा ३० दिवसांचा उपवास

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**आर्णी :** भगवान महावीरांच्या अनुशासनाचे अनुयायी व परमपूज्य आचार्य रामलालजी महाराजांचे शिष्य परमपूज्य पुष्यमित्रजी महाराज चातुर्मासासाठी आर्णी नगरीत विराजमान आहेत. त्यांच्या प्रेरणेने व भगवान महावीरांच्या आशीर्वादाने ईश्वरचंद दुगड यांच्या सूनबाई निकिता प्रतीक कुमार दुगड यांनी मासक्षमण अर्थात ३० दिवसांच्या उपवासाची कठीण तपश्चर्या करण्याचा संकल्प केला.

दि. २ ऑगस्टपासून सुरू झालेली ही तपश्चर्या दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण होत आहे. केवळ पाण्याच्या आधारावर सलग ३० दिवस उपवास करणे, हे आत्मसंयम, श्रद्धेचे उदाहरण आहे. निकिता दुगड यांनी मनावर पूर्ण नियंत्रण ठेवत ही



कठोर तपश्चर्या यशस्वीपणे पूर्ण केली. त्यांच्या या साधनेमुळे आर्णीतील जैन समाजात आनंदाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, आर्णीच्या इतिहासात मासक्षमण तपश्चर्या करण्याचा हा तिसरा मान असल्याचे सांगण्यात आले. या अनुपम तपश्चर्येबद्दल निकिता दुगड यांचे समाजबांधवांकडून अभिनंदन व अनुमोदना करण्यात येत असून, त्यांच्या तपश्चर्येला शतशः नमन करण्यात येत आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या उपोषणाला पाठिंबा

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**यवतमाळ :** आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक मागण्यांसाठी यवतमाळ येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाला विविध सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांनी भेट देत जाहीर पाठिंबा दिला.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी, रखडलेली भरती प्रक्रिया लवकर पूर्ण करावी तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वसतिगृहासंदर्भातील शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी, यांसह विविध मागण्यांसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत.




या आंदोलनस्थळी कोतवाल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष योगेश शेडमाके, भारतीय जनता पक्षाचे आदिवासी आघाडीचे अध्यक्ष नागोराव गेडाम तसेच भारतीय जनता पक्षाचे पांढरकवडा माजी तालुकाध्यक्ष सुनीलभाऊ सिडाम सामाजिक कार्यकर्ते योगेश मडावी महादेव सोयाम यांनी भेट देऊन उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी विद्यार्थ्यांच्या मागण्या जाणून घेत त्यांच्या शैक्षणिक हक्कांसाठी आणि न्याय्य मागण्यांसाठी जाहीर पाठिंबा व्यक्त करण्यात आला.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न असल्याने शासनाने तातडीने दखल घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# अवयवदानाचा आदर्श; मडावी कुटुंबीयांना २१ हजारांची मदत

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**यवतमाळ :** पतीच्या निधनाच्या दुःखातून सावरत मानवतेच्या भावनेतून अवयवदानाचा निर्णय घेणाऱ्या मडावी कुटुंबीयांना यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेने २१ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. संस्थेच्या वतीने कै. कोंडबा दत्तात्रय मडावी यांच्या पत्नी ज्योती मडावी यांना साडी-चोळी व २१ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.

घाटंजी येथील जिल्हा परिषद शिक्षक कै. कोंडबा मडावी (वय ५२) यांचा अपघाती मृत्यू झाला होता. त्यानंतर पत्नी ज्योती मडावी व कुटुंबीयांनी सामाजिक भान जपत त्यांच्या अवयवदानाचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे तीन गरजू रुग्णांना



नवजीवन मिळण्यास मदत झाली.

कै. मडावी हे पतसंस्थेचे नियमित सभासद नसतानाही 'सामाजिक बांधिलकी' आणि 'मानवतेचा गौरव' या भावनेतून संचालक मंडळाने कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. संस्था केवळ आर्थिक व्यवहारांपुरती मर्यादित न राहता सामाजिक उपक्रम, शैक्षणिक सहाय्य तसेच संकटसमयी गरजूंना मदत करण्यासाठी कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर, संचालक डॉ. तुषार आत्राम, अभिजीत ठाकरे, संघटनेचे जिल्हा नेते रविंद्र उमाटे, विशाल साबापुरे, राजेंद्र गोबाडे, शरद सोयाम, अविनाश राठोड व शैलेश निबुदे उपस्थित होते.

मडावी कुटुंबीयांच्या मानवतावादी निर्णयाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

# बीएसएनएलचे कामकाज गतिमान करा; ग्राहकांना उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा पुरवा: खासदार डॉ.अनिल बोंडे

## दूरसंचार सल्लागार समितीची बैठक संपन्न; स्थानिक कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यावर भर

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अमरावती :** बीएसएनएलची सेवा अधिक गतिमान करणे, सोशल मीडियावर बीएसएनएलला सक्रिय करणे, कार्यालयाचा संपूर्ण पत्रव्यवहार आणि कामकाज हिंदी भाषेतून करणे तसेच हिंदी पखवाड्याचे प्रभावी आयोजन यांसारख्या विविध ग्राहकस्नेही उपक्रमांद्वारे सेवा सुधारण्याचे निर्देश दूरसंचार सल्लागार समितीच्या बैठकीत राज्यसभेचे सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी बीएसएनएलच्या महाप्रबंधक माधुरी निमजे यांच्यासह त्यांच्या अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

दूरसंचार सल्लागार समितीची (TAC) महत्त्वपूर्ण बैठक खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (ता.२९) घेण्यात आली दरम्यान BSNL च्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीत अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातून प्राप्त झालेल्या विविध तक्रारींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार प्रताप अडसड, मेळघाटचे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी पाठवलेल्या आपापल्या विधानसभा क्षेत्रातील नेटवर्क आणि दूरसंचार विषयक समस्यांवरही बैठकीत गांभीर्याने विचार करण्यात आला. ग्राहकांसाठी कवी संमेलनासारखे उपक्रम आयोजित करून बीएसएनएलच्या नव्या सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या सूचना दरम्यान करण्यात आल्या. या प्रसंगी महाप्रबंधक माधुरी निमजे, टीएसी सदस्य उमेश अकारते, सागर शिंगणे, अंकुश बडगोचर, शशांक पठारे, ॲड. अरुण जिचकार, प्रवीण वैश्य, राजेश आखेगावकर, विवेक डी मिश्रा, विजय जे पांडे, मधुकर के गायकवाड़ यांच्यासह अन्य उपस्थित होते.

### शेवटच्या घटकापर्यंत उत्तम कनेक्टिव्हिटी पोहोचवणे हे आमचे ध्येय

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित दादा जगताप यांच्या नेतृत्वात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशातील दूरसंचार क्षेत्र अत्यंत वेगाने मजबूत होत आहे. स्थानिक पातळीवर शेवटच्या घटकापर्यंत उत्तम कनेक्टिव्हिटी पोहोचवणे हे आमचे मुख्य ध्येय आहे. बीएसएनएलने आपल्या कामकाजात अधिक गतिमानता आणून नागरिकांना उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा पुरवाव्यात, जेणेकरून सामान्य जनतेचा विश्वास आणखी दृढ होईल.

**डॉ. अनिल बोंडे,** खासदार राज्यसभा

# नांदुरा येथे महिला राजसत्ता आंदोलनाच्या गावशाखेचा शुभारंभ

## अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि महिला नेतृत्वावर प्रबोधन

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अमरावती :** महिलांचा सामाजिक, सार्वजनिक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासोबतच गावातील विविध प्रश्नांवर महिलांनी संघटितपणे पुढाकार घ्यावा, या उद्देशाने नांदुरा येथे महिला राजसत्ता आंदोलनाच्या गावशाखेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी गावशाखेच्या फलकाचे उद्घाटन, महिलांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा तसेच अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

गावशाखेच्या फलकाचे उद्घाटन नांदुरा सरपंच भाग्यश्री किरकटे यांच्या हस्ते झाले. व्ही. एम. व्ही. महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रतिभा बोरजार यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महिलांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावतीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रफुल्ल मंदा श्रीधर आणि महिला राजसत्ता आंदोलनाच्या जिल्हा समन्वयक प्रतिभा खापरे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत महिला राजसत्ता आंदोलनाची भूमिका, उद्दिष्टे आणि गावशाखेच्या कार्यपद्धतीबाबत माहिती देण्यात आली. महिलांनी ग्रामपंचायत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन गावाच्या विकासाशी संबंधित प्रश्न मांडावेत आणि महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी संघटितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी अंधश्रद्धेविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी विचारांची गरज यावरही प्रबोधन करण्यात आले. अंधश्रद्धेमुळे निर्माण होणारी भीती, गैरसमज आणि त्यातून होणारे शोषण रोखण्यासाठी महिलांनी प्रश्न विचारण्याची आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याची भूमिका घ्यावी, असे सांगण्यात आले.

व्यसनमुक्तीचा विषयही कार्यक्रमात महत्त्वाने मांडण्यात आला. दारू, तंबाखू, गुटखा आदी व्यसनांमुळे कुटुंबाच्या आरोग्यावर, आर्थिक परिस्थितीवर आणि सामाजिक वातावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत जनजागृती करण्यात आली. व्यसनाधीन व्यक्तींना केवळ दोष न देता त्यांना समुपदेशन, कुटुंबाचा आधार आणि सामाजिक सहकार्याच्या माध्यमातून व्यसनमुक्तीकडे नेण्याची गरज व्यक्त करण्यात आली. व्यसनमुक्त व विवेकवादी समाजनिर्मितीत महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

### नांदुरा गावशाखेची कार्यकारिणी जाहीर

यावेळी महिला राजसत्ता आंदोलनाच्या नांदुरा गावशाखेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्ष धनश्री किरकटे, उपाध्यक्ष दर्शना उगवकर, सचिव कांचन कचरे आणि कोषाध्यक्ष सोनू भडके यांची निवड करण्यात आली.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला पांढरकवडा येथुन अटक

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अमरावती:** खुनाच्या गुन्हयातील आरोपीला पांढरकवडा येथुन अटक करण्यात पोलिसांना यश आला आहे. २६/०८/२०२६ रोजी फिर्यादी मो. अयाज मो हनीफ वय ६६ वर्ष रा माहुली जहागिर यांनी पोलीस स्टेशन माहुली जहागिर येथे जबानी रिपोर्ट दिला की, त्याचे शेतात सिवनी मध्यप्रदेश येथे राहणारे पती, पत्नी दशरथ मांगुळकर व पुजा मांगुळकर हे कामाकरीता शेतात राहत होते दि ०४/०७/२०२६ रोजी फि हे शेतात गेले असता त्याना पुजा ही दिसली नाही तेव्हा त्यानी तिचा पती दश्रथ यांना विचारले असता त्याने सागितले तिने दुसरे लग्न केले. असे सांगितले दि ०५/०७/२०२६ दशरथ हा सुध्दा काम सोडुन गेला होता. दि २४/०८/२०२६ रोजी फिर्यादी यांना दशरथ यांचा फोन आला की, पुजा हीचे प्रेत तुमच्या विहीरीत आहे अशी माहीती भेटली आहे तुम्ही जावुन पहा अशा माहीती वरून फि यानी शेतात जावुन पाहीले असता त्याना पुजा दशरथ मांगुळकर हीचे प्रेत विहीरीत तरंगताना दिसले कोणीतरी अज्ञात इसमाने जिवाने ठार मारून विहीरीत टाकले अशा फिर्यादी वरून पोस्टे ला अप क १६६/२०२६ कलम १०३(१) भा.न्या.स. अन्वये नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक यांनी सदर गुन्हयात त्वरीत आरोपीला अटक करून गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या. वरून पोस्टे माहुली येथील एक तपास पथक नेमण्यात आले. गोपनिय माहीती व तांत्रिक माहीती व्दारे माहीती प्राप्त झाली की, पुजा हीची हत्या तिचा पती दशरथ गुरूप्रसाद मांगुळकर रा सिवनी ताजि पांढुर्णा मध्यप्रदेश यांनी केला असुन तो सध्या पेराम्बुर तामिळनाडु येथे आहे अशी माहीती मिळाल्यावरून सदर पथक त्वरीत तामिळनाडु येथे रवाना करण्यात आले.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्सच्या विद्यार्थ्यांची संत गाडगेबाबा वृद्धाश्रमात सामाजिक भेट

## पोटे अभियांत्रिकीचा माणुसकी, करुणा आणि कृतज्ञतेचा संदेश देणारा उपक्रम

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अमरावती:** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स (AI&DS) विभाग आणि FAID (Forum of AI Developer) फोरमच्या वतीने संत गाडगेबाबा परमधाम वृद्धाश्रमास सामाजिक भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता, माणुसकी आणि ज्येष्ठांप्रती आदराची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या जीवनातील अनुभव, आठवणी आणि कथा जाणून घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण घालवले. विद्यार्थ्यांनी ज्येष्ठांसोबत हास्यविनोद व संवाद साधत त्यांना आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या सहवासामुळे वृद्धाश्रमातील वातावरण आनंदमय झाले.

हा उपक्रम केवळ सामाजिक भेट न राहता विद्यार्थ्यांसाठी माणुसकी, करुणा आणि कृतज्ञतेचा प्रेरणादायी अनुभव ठरला. तंत्रज्ञान हे भविष्यातील प्रगतीचे महत्त्वाचे साधन असले, तरी माणुसकी हीच समाजाची खरी पायाभूत शक्ती आहे, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला. या उपक्रमासाठी AI&DS विभागाचे विभागप्रमुख डॉ. अजय बी. गाडिचा यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. मीनल पारडे यांनी जबाबदारी सांभाळली, तर सहसमन्वयक प्रा. एम. एस. चिंचामलतपुरे यांनी सहकार्य केले.

# अंबा नाल्यात कचरा टाकणाऱ्यांना महापौरांचा दणका; दोन दंडांची कारवाई

## राजकमल चौक ते राजापेठदरम्यान महापौर श्रीचंद तेजवानी यांची पाहणी

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अमरावती:** अमरावती शहरातील नाले, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेने आता कडक भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. शहरातील राजकमल चौक ते राजापेठ या मार्गादरम्यान मध्यभागी असलेल्या अंबा नाल्याची अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी आज रविवार, 30 ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान नाल्यामध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून संबंधितांकडून दोन दंड आकारण्यात आले.

महापौरांच्या अचानक पाहणीमुळे नाल्यांमध्ये बेकायदेशीरपणे कचरा टाकणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. शहरातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने पावसाळ्यात नाल्यांमध्ये अडथळे निर्माण होऊन पाणी साचण्याची तसेच दुर्गंधी आणि विविध आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवू नये, अशा स्पष्ट सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

### कचरा नाल्यात नव्हे, घंटागाडीतच द्या

पाहणीदरम्यान नागरिकांशी संवाद साधताना महापौर श्रीचंद तेजवानी यांनी अमरावतीकरांना महत्त्वाचे आवाहन केले. घरातील तसेच परिसरातील कचरा नाल्यात, रस्त्यावर किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी टाकू नये. महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या घंटागाडीमध्येच नागरिकांनी आपला कचरा द्यावा, असे त्यांनी सांगितले.

# संमती कॉलनी व नवजीवन कॉलनीतील विकास कामांचे आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते भूमीपुजन

## वाढत्या नागरी लोकवसाहती भागात पायाभूत सुविधांची पूर्तता करण्यास कटिबद्ध - आ.सौ.सुलभाताई खोडके

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अमरावती:** अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील शेगाव–रहाटगाव प्रभागातील वाढत्या नागरी लोकवस्तीच्या भागात पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने विविध विकासकामांना गती देण्यात येत आहे. याच अनुषंगाने संमती कॉलनी व नवजीवन कॉलनी परिसरातील विकासकामांचे भूमिपूजन आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते करण्यात आले.

संमती कॉलनी येथे नाली बांधकाम व रस्ता बांधकाम, तसेच नवजीवन कॉलनी येथील रस्ता बांधकाम या कामांचा यामध्ये समावेश आहे. यावेळी आमदार महोदयांनी विकास कामांचे स्थळी कुदळ मारीत व नामफलकाचे अनावरण करून भूमिपूजनाची औपचारिकता साधली.

यावेळी बोलतांना आमदार - सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या की, "अमरावती शहरातील वाढत्या नागरी लोकवसाहतींमध्ये नागरिकांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली प्राथमिकता आहे. रस्ते, नाली, पाणी, स्वच्छता यांसह मूलभूत सुविधांची पूर्तता करण्यासाठी आपण कटिबद्ध असून विकासकामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. नागरिकांनी आपल्या प्रभागात निर्माण झालेल्या विकासात्मक सुविधांचा लाभ घेत असतांना त्या दीर्घकाळ टिकल्या पाहिजे , यासाठी सामाजिक बांधिलकी जोपासत आपल्या प्रभागाचे सौंदर्य अबाधित राखण्यास सहकार्य अपेक्षित असल्याचे आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले.

# राजापेठ येथील तलाठी कार्यालय, साझा क्रमांक-6 येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र नसल्याची तक्रार

## वैभव उके यांनी उचलला मुद्दा

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अमरावती :** राजापेठ येथील तलाठी कार्यालय, साझा क्रमांक ६ हे शासकीय कार्यालय आहे.

सदर कार्यालयात देव देवतांचे छायाचित्र लावलेले दिसून आले. मात्र भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र लावलेले आढळून आले नाही. नसल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते वैभव उके यांनी केली आहे.



सदर प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून संबंधित प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# इंधन असूनही रुग्णवाहिका नाकारल्याची बातमी तथ्यहीन

## जिल्हा स्त्री रुग्णालयाचे स्पष्टीकरण

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्हा स्त्री रुग्णालयात इंधन उपलब्ध असतानाही रुग्णाला रुग्णवाहिका देण्यास नकार दिल्याचा आरोप फेटाळत रुग्णालय प्रशासनाने यासंदर्भातील वृत्त पूर्णपणे तथ्यहीन आणि दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्ट केले आहे. 30 ऑगस्ट 2026 रोजी दैनिक वृत्तपत्र आणि सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या बातम्यांनंतर जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी या प्रकरणी सविस्तर खुलासा सादर केला आहे.

आमदार चित्रा वाघ या दि. 29 ऑगस्ट रोजी रुग्णालयाच्या भेटीवर आल्या होत्या. त्याचवेळी रीना रमेश उईके (रा. माहुल जहांगीर) या डिस्चार्ज दिलेल्या रुग्णाला घरी सोडण्यासाठी रुग्णवाहिकेची वाट पाहावी लागत होती. यापूर्वीची रुग्णवाहिका दुसऱ्या रोशनी हरीष शिंगणे (रा. नांदगाव खंडेश्वर) यांना पीडीएमसी रुग्णालयात सोडण्यासाठी गेली होती. ती रुग्णवाहिका परत येण्यासाठी केवळ 15 ते 20 मिनिटांचा वेळ असल्याने डिस्चार्ज मिळालेल्या रुग्णाला थोडा वेळ थांबण्यास सांगण्यात आले होते. मात्र, रुग्णवाहिकेत इंधनच नसल्यामुळे रुग्णाला थांबवून ठेवल्याचा आरोप या दरम्यान करण्यात आला.

आमदार चित्रा वाघ यांनी रुग्णाकडे चौकशी केली असता, त्यांनी 5 ते 10 मिनिटांपासून वाट पाहत असल्याचे सांगितले. त्यावेळेस रुग्णालयात उभी असलेली कंत्राटी रुग्णवाहिका आणि तिचा चालक वॉर्डातील इतर रुग्णांना आणण्यासाठी गेले होते. त्यानंतर लगेचच उपलब्ध कंत्राटी रुग्णवाहिकेतून रुग्णाला त्यांच्या गावी रवाना करण्यात आले.

सामान्य रुग्णालय, अमरावती अंतर्गत 108 आणि 102 क्रमांकाच्या एकूण 48 रुग्णवाहिका चोवीस तास उपलब्ध असतात. यापैकी 4 रुग्णवाहिका जिल्हा स्त्री रुग्णालयाला देण्यात आलेल्या आहेत. सर्व 4 रुग्णवाहिका सुस्थितीत असून त्यामध्ये पुरेसे इंधन उपलब्ध होते. यातील 2 रुग्णवाहिका मेळघाट भागातील रुग्णांसाठी, तर 2 रुग्णवाहिका स्थानिक सेवेसाठी कार्यरत आहेत. घटनेच्या वेळी या चारही रुग्णवाहिका इतर रुग्णांना पोहोचवण्यासाठी बाहेर गेल्या होत्या.

# ब वर्ग तीर्थक्षेत्र श्री. कोंडेश्वरच्या विविध कामांना प्रारंभ

## आमदार रवी राणा यांच्या शुभहस्ते माजी खा. नवनीत राणा यांच्या उपस्थितीत लोकार्पण

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अमरावती:** ब वर्ग तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र कोंडेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या निधीतून विविध विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा आज मोठ्या उत्साहात आणि भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. मुख्यमंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या प्रयत्नांना आमदार रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची जोड मिळाल्याने श्री क्षेत्र कोंडेश्वरच्या विकासासाठी हा भरीव निधी मंजूर झाला आहे.

या निधीतून उद्योग भवन सभागृह, गणेश भवन, शंकर-पार्वती संकुल, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधांची विविध कामे करण्यात येणार आहेत. या विकासकामांमुळे श्री. क्षेत्र कोंडेश्वरच्या धार्मिक, सामाजिक व पर्यटन विकासाला मोठी चालना मिळणार असून, भाविकांसाठी आवश्यक सुविधा अधिक सक्षम होणार आहेत. या विकासकामांचा शुभारंभ विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष तथा आमदार रवी राणा यांच्या शुभहस्ते, माजी खासदार सौ. नवनीत रवी राणा, सरपंच, श्री क्षेत्र कोंडेश्वर संस्थानचे ट्रस्टी, ह.भ.प. ॲड. सागर महाराज देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे, सभापती, नगरसेवक आणि विविध पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

कार्यक्रमाला संबोधित करताना आमदार रवी राणा यांनी माजी खासदार नवनीत राणा यांच्या अमरावती जिल्ह्यासाठी केलेल्या कार्याचा विशेष उल्लेख केला. "जर नवनीत राणा पुन्हा निवडून आल्या असत्या, तर डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्यानंतर अमरावती जिल्ह्यातून दुसऱ्या कॅबिनेट मंत्री झाल्या असत्या. याची खंत संपूर्ण जिल्ह्याला आहे," अशी भावना आमदार रवी राणा यांनी व्यक्त केली. नवनीत राणा यांनी आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात संसदेत अमरावती जिल्ह्याचा आवाज सातत्याने बुलंद केला. जिल्ह्यातील विविध विकासकामे आणि प्रलंबित प्रश्न केंद्र शासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला, असे आमदार रवी राणा यांनी सांगितले.

### २५ कोटींच्या निधीतून कोंडेश्वरचा विकासाला गती

श्री. क्षेत्र कोंडेश्वर हे अमरावती जिल्ह्यातील महत्त्वाचे धार्मिक आणि पर्यटनस्थळ आहे. २५ कोटी रुपयांच्या मंजूर निधीतून होणाऱ्या विकासकामांमुळे तीर्थक्षेत्राच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होणार आहे. उद्योग भवन सभागृह, गणेश भवन, शंकर-पार्वती संकुल, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी सुविधांमुळे भाविक, नागरिक तसेच परिसरातील ग्रामस्थांना मोठा लाभ मिळणार आहे. या विकासकामांमुळे कोंडेश्वरच्या धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच परिसरातील रोजगार व स्थानिक आर्थिक विकासालाही गती मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# गुटखा तस्कर तापडिया प्रकरण...
# असे काय घडले; घटनास्थळच बदलले !

## * १ महिना उलटला, आरोपी नाही सापडला * वाशीम ग्रामीण पोलीस पुन्हा संशयाच्या भोवऱ्यात

● नाजीर शेख @ वाशीम ●

वाशीम -रिसोड मार्गावर अवैध गुटखा तस्करीविरोधात झालेल्या कारवाईनंतर या प्रकरणाला नवे वळण आला आहे. लाखो रुपयांचा गुटखा जप्त करून वाहनचालकासह मुख्य तस्कर विजय तापडिया याच्यावर वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. असे असले तरी मुख्य आरोपी विजय तापडिया अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. दरम्यान, या कारवाईबाबत धक्कादायक माहिती समोर येत असून पोलिसांनी पंचनाम्यात नमूद केलेले घटनास्थळ आणि प्रत्यक्ष कारवाईचे ठिकाण वेगळे असल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात. जर हा आरोप खरा असेल, तर असे काय घडले की वाशिम ग्रामीण पोलिसांनी थेट घटनास्थळच बदलले ,असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारवाईचे घटनास्थळच बदलल्यामुळे वाशिम ग्रामीण पोलीस पुन्हा संशयाच्या भोवऱ्यात आले असून या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून घटनास्थळ बदलणाऱ्या संबंधित दोषी पोलिसांवर कारवाईची मागणी होत आहे.

१ ऑगस्ट रोजी वाशिम ग्रामीण पोलिसांनी वाशिम-रिसोड मार्गावरील जांभरुण-नावजी उड्डाणपुलाजवळ नाकाबंदी करून गुटख्याने भरलेले एक वाहन जप्त केल्याचे सांगितले होते. या कारवाईत वाहनासह गुटखा असा एकूण ९ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून मुख्य गुटखा तस्कर विजय तापडिया व चालक रुपेश ताराचंद पवार यांच्याविरुद्ध वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी चालक रुपेश पवार याला अटक करण्यात आली असून तो सध्या जिल्हा कारागृहात आहे. दरम्यान, त्याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. या कारवाईला एक महिना उलटला असून मात्र मुख्य गुटखा तस्कर विजय तापडिया अद्याप फरार आहे.या संदर्भात दैनिक सिटी न्यूज सुपरफास्टने या प्रकरणाची वृत्तमालिका लावून धरली असून, या कारवाईबाबत धक्कादायक माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. वाशिम ग्रामीण पोलिसांनी कारवाईचे घटनास्थळ वाशिम-रिसोड मार्गावरील जांभरुण-नावजी उड्डाणपूल दाखविले आहे. मात्र प्रत्यक्षात ही कारवाई वाशिम शहर हद्दीतील शुक्रवार पेठ येथील मन्नासिंह चौकात करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.जर वाशिम ग्रामीण पोलिसांनी ही कारवाई वाशिम शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत केली होती.तर घटनास्थळ बदलण्यामागचे नेमके कारण काय होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच कारवाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत होत असताना याबाबत शहर पोलिसांना माहिती का देण्यात आली नाही, याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.घटनास्थळ बदलून वाहनातील जप्त गुटख्याचे प्रमाण कमी दाखविण्यात आले का ? ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई कोणत्या अधिकाराने केली. तसेच याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना पूर्वकल्पना देण्यात आली होती का ?असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या संपूर्ण गुटखा कारवाईची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच कारवाईचे कथित घटनास्थळ का बदलले या प्रकरणी जबाबदार पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे.







### या कारवाईतील एक कर्मचारी याआधीही राहिला वादग्रस्त.

त्या दिवशी गुटख्याने भरलेला वाहन हा रिसोड मार्गाने आला नसून तो दुसऱ्याच मार्गाने वाशिम शहरात दाखल झाला.शहरात दाखल झाल्यावर शुक्रवार पेठ भागातील मन्नासिंह चौकात त्या वाहनाला ग्रामीण पोलिसांनी पकडले.दरम्यान वाहन चालक आणि संबंधित मुख्य तस्करांसोबत दोन पोलीस कर्मचाऱ्यांची मोबाईलवर चर्चा झाली. त्यानंतर गाडीतील अर्धा गुटख्याचा माल एका घरात खाली करण्यात आले. उरलेला माल वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात आणण्यात आला. अशी माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.या सर्व प्रकरणात दोन पोलीस कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. त्यामधील एका पोलीस कर्मचाऱ्यांचा याआधी जऊळका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारूवाल्यांकडून पैसे घेतानांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यावर तत्कालीन पोलीस अधीक्षक बच्चनसिंह यांनी कारवाई केली होती.

### वाशिम ग्रामीणचे तपास अधिकारी बदलण्याची मागणी .

या गुटखा कारवाईला तब्बल एक महिना उलटला असून मुख्य आरोपी हा अजून मोकाट आहे.तो अजूनही रिसोड पोलिसांच्या संपर्कात असून तेथील एका 'विनोद' सोबत त्याचे अनेक वेळा गुप्त बैठका झाल्या आहेत आहे.वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी रिसोडला येण्याआधी त्या 'विनोद'ला संपर्क करतात.ती माहिती थेट मुख्य गुटखा तस्कर तापडिया पर्यंत पोहचते.त्यामुळे आरोपी ग्रामीण पोलिसांच्या हाती लागत नाही.एक प्रकारे रिसोड पोलीस ठाण्याचे फितूर कर्मचारी तपास अधिकाऱ्याची यांची दिशाभूल करून आरोपी तापडियाला मदत करत असल्याचा आरोप केला जात आहे.त्यामुळे आता आरोपीला अटक करण्यासाठी या तपास अधिकारीला बाजूला करून दुसरा तपास अधिकारी नियुक्त करण्याची मागणी केली जात आहे.





## थोडक्यात

### शुभम नगर येथील शिरभाते यांच्या घरी चोरी

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा येथील मराठा हॉटेल च्या पाठीमागे दि.२७ ऑगस्ट गुरुवारी रात्री चे वेळी एम.के.शिरभाते रा.शुभम नगर,यांचे स्वतःच्या राहत्या घरी चोरी झाली असून शिरभाते दाम्पत्य हे रक्षाबंधन निमित्त गावी गेले होते.घरामध्ये सामसूम असल्याने अज्ञात चोरांनी डाव साधून रात्री लोखंडी गेटचे व घराचे कुलूप तोडून घरातील काही साहित्य व अंदाजे पंधरा हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने व त्या पेक्षा ही महत्वाची महानुभाव पंथीय देवपूजा ज्याची पितळेच्या पत्र्याची बांधणी केलेली होती.देवपूजा २-मोठे ६ ते ८ इंचीचे उंच व ८ लहान २ ते ४ इचेचे उंच असे एकुण १० नग विशेष नमस्कारी पाषाण सोन्याची पत्रे असल्याचे समजून चोरटे चोरून घेऊन फरार झाले शिरभाते यांनी पोलीस स्टेशनला कुठली ही लेखी तक्रार दिली नसल्याचे समजते तसेच देवपूजा मिळवून देणाऱ्यास सन्मानार्थ विशेष भेटवस्तु बक्षीस देण्यात येईल.तरी कृपया सहकार्य करावे असे ही त्यांनी म्हटले आहे.



### मंगरूळपीर पोलिस स्टेशनमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर, जि. वाशिम : रक्षाबंधनानिमित्त मंगरूळपीर पोलिस स्टेशनमध्ये गुडलाईफ फाउंडेशनच्या अध्यक्षा गीता वोरा यांच्या पुढाकाराने रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी गीता वोरा व फाउंडेशनच्या सदस्यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.पोलिस बांधव समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असतात. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच गुडलाईफ फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### विद्याभारती महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान' जनजागृती कार्यक्रम



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय,कारंजा (लाड) येथे विद्यार्थ्यांसाठी नशामुक्तीविषयक मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात खंडेराव रंजवे,पोलीस निरीक्षक,ANTF, अमरावती विभाग यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास विजय महल्ले,अभिराज इंदुरकर व रियाज अहमद यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पर्यवेक्षक ललित खरड,सौ.विभा लाहोटी,वैजंत पाटील,डॉ.लोढा,प्रा.इंगोले,कु. कोथळकर इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

## मानव विकास बस अपुरी, विद्यार्थिनींची धोक्याची सवारी !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी सुरक्षित, नियमित व सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मानव विकास मिशनअंतर्गत जिल्ह्यात विविध ठिकाणी बस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र, काही ठिकाणी विद्यार्थिनींची संख्या मोठी असताना बसची संख्या अपुरी पडत असल्याने गर्दीचा प्रश्न गंभीर बनला आहे. क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थिनी प्रवास करत असून, काहींना उभे राहून प्रवास करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

एकाच बसला अनेक गावांमध्ये फेऱ्या कराव्या लागत असल्याने विद्यार्थिनींना वेळेवर शाळेत पोहोचण्यात अडचणी येत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी बसच्या वेळापत्रकामुळे विद्यार्थिनींचे एक-दोन शैक्षणिक तास बुडत असल्याचीही तक्रार आहे. परतीच्या प्रवासात उशीर होऊन काही विद्यार्थिनींना अंधार पडल्यानंतर घरी पोहोचावे लागत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.मानव विकास मिशनचा मुख्य उद्देश विद्यार्थिनी वाहतुकीअभावी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांना सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळावी आणि पूर्ण शैक्षणिक वेळेचा लाभ मिळावा हा आहे. मात्र, बस अपुरी,





विद्यार्थिनींची संख्या जास्त आणि गर्दीत उभे राहून प्रवास करण्याची वेळ येत असेल, तर मिशनचा मूळ हेतू कितपत साध्य होत आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी**

जिल्ह्यात मानव विकास मिशनअंतर्गत उपलब्ध असलेल्या बसची क्षमता, प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या, प्रत्येक फेरीतील गर्दी आणि बसच्या अपुऱ्या संख्येमुळे शिक्षणावर होणारा परिणाम याची वाशिम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.ज्या ठिकाणी विद्यार्थिनींच्या संख्येच्या तुलनेत एकच बस अपुरी पडत आहे.

त्या ठिकाणी अतिरिक्त बसची व्यवस्था करून विद्यार्थिनींचा सुरक्षित प्रवास आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.एखादी अनुचित घटना घडल्यानंतर चौकशी करण्यापेक्षा, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरत आहे.





**मानव विकास बसचा उद्देशच फोल?**

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, हा मानव विकास मिशनचा उद्देश आहे. मात्र बस अपुरी पडून गर्दीत व उभे राहून प्रवास करावा लागत असेल, तर हा उद्देश कितपत साध्य होत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**बस किती, विद्यार्थिनी किती?**

जिल्ह्यात किती मानव विकास बस आहेत आणि त्यातून किती विद्यार्थिनी प्रवास करतात, याचा प्रशासनाने आढावा घ्यावा. विद्यार्थिनींच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत बस पुरेशा आहेत का, याची तपासणी आवश्यक आहे.

**क्षमतेपेक्षा जास्त गर्दी; जबाबदारी कोणाची?**

बसची क्षमता आणि प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या तपासणे गरजेचे आहे. गर्दीमुळे उभे राहून प्रवास करावा लागत असेल, तर अनुचित घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, असा सवाल उपस्थित होत आहे.





**शिक्षणासाठी बस; पण तासच बुडाले**

वेळेवर शाळेत पोहोचण्यासाठी बसची सुविधा देण्यात आली आहे. मात्र अनेक फेऱ्यांमुळे काही विद्यार्थिनींचे शैक्षणिक तास बुडत असल्याची तक्रार आहे.

**सुरक्षित प्रवासाचा दावा; घरवापसी मात्र अंधारात!**

बसच्या अपुऱ्या संख्येमुळे अनेक फेऱ्या कराव्या लागत असून परतीच्या प्रवासालाही उशीर होत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. काही विद्यार्थिनींना अंधार पडल्यानंतर घरी पोहोचावे लागत असल्याने चिंता वाढली आहे.

**जिल्हाभर बसचे सर्वेक्षण करा**

हा प्रश्न केवळ एका ठिकाणापुरता मर्यादित आहे की जिल्ह्यात इतरत्रही बस अपुऱ्या पडत आहेत, याची तपासणी आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हास्तरावर आढावा घ्यावा.

**विद्यार्थिनी वाढल्या; बस वाढली का?**

बस सुरू करण्यात आली तेव्हाची आणि सध्याची विद्यार्थिनी संख्या तपासण्याची गरज आहे. संख्या वाढली असेल, तर त्या प्रमाणात बसची संख्या वाढविण्यात आली का, असा प्रश्न आहे.

**बसच्या फेऱ्यांचे नियोजन योग्य आहे का?**

एकाच बसला अनेक गावांमध्ये फेऱ्या कराव्या लागत असल्याने विद्यार्थिनींचा वेळ व शिक्षण प्रभावित होत असल्याची तक्रार आहे. गावांचे अंतर आणि विद्यार्थिनींची संख्या लक्षात घेऊन नियोजनाची गरज आहे.

**तक्रारीनंतरही उपाय कधी?**

समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतरही प्रत्यक्ष उपाययोजना कधी होणार, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित होत आहे. गरजेनुसार अतिरिक्त बस उपलब्ध करण्याची मागणी होत आहे.

**अपघात झाल्यावरच प्रशासन जागणार का?**

गर्दीत विद्यार्थिनी प्रवास करत असल्याची तक्रार असेल, तर अनुचित घटना घडण्यापूर्वीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. अपघातानंतर चौकशीपेक्षा आधीच सुरक्षिततेची व्यवस्था करावी, अशी मागणी आहे.

**पालकांच्या चिंतेकडे कोण लक्ष देणार?**

गर्दीचा प्रवास आणि परतीच्या वेळेतील उशिरामुळे पालकांमध्ये चिंता आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षित वाहतुकीकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

**मिशनचा प्रत्यक्ष आढावा हवा...**

जिल्ह्यात किती बस कार्यरत आहेत, किती विद्यार्थिनी त्यांचा लाभ घेत आहेत आणि कुठे बस अपुऱ्या पडत आहेत, याचा प्रत्यक्ष आढावा घेण्याची गरज आहे. आवश्यक ठिकाणी अतिरिक्त बस उपलब्ध कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करा

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

शिक्षक हे समाजाचे शिल्पकार असून, त्यांच्यावर अध्यापनाव्यतिरिक्त विविध कामांची जबाबदारी सोपविली जात असल्याने त्यांच्या मूळ शैक्षणिक कार्यावर परिणाम होत आहे.त्यामुळे शिक्षकांना इतर अशैक्षणिक कामे देणे थांबवावे,असा सूर अमरावती विभागीय शिक्षक मेळाव्यात अनेक मान्यवरांनी व्यक्त केला.शिक्षकांच्या विविध समस्या,अपेक्षा व प्रश्नांवर विचारमंथन करण्यासाठी रविवार,३० ऑगस्ट रविवार रोजी शेलूबाजार रोडवरील कन्हैया रिसॉर्ट



कारंजा लाड येथे आयोजित या एकदिवसीय मेळाव्याला विभागातील हजारो महिला व पुरुष शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

तर आभार मेळाव्याचे आयोजक गोविंद पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक तथा मेस्टा शिक्षक संघटनेचे विदर्भ अध्यक्ष किरण चौधरी यांनी मानले.विभागातील हजारो शिक्षकांच्या उपस्थितीमुळे मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## बालदेव येथे मैला प्रक्रिया प्रकल्पास ग्रामस्थांचा विरोध

### ग्रामसभेचा सर्वानुमते ठराव; हरकतीवर सुनावणी घेण्याची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मौजे बालदेव येथील सर्वे क्रमांक १, गट क्रमांक ६५ मधील शासकीय जागेवर प्रस्तावित मैला प्रक्रिया प्रकल्पास ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात ग्रामसभेत सर्वानुमते विरोधाचा ठराव मंजूर करण्यात आला असून, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे लेखी हरकत सादर करण्यात आली आहे.

तहसीलदार कार्यालयाकडून ५ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीरनाम्यानंतर ग्रामस्थांनी हरकती नोंदविल्या आहेत. मात्र, अद्याप ग्रामस्थांची सुनावणी झालेली नसताना प्रकल्पासाठी जागेची मोजणी करण्याची कार्यवाही झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. हरकतीवर सुनावणी व अंतिम निर्णय होईपर्यंत मोजणी, हस्तांतरण अथवा प्रकल्पासंदर्भातील कोणतीही पुढील कार्यवाही करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामस्थांची सुनावणी घेऊन ग्रामसभेचा ठराव व लेखी हरकतींचा विचार करूनच निर्णय घ्यावा, अशी मागणी हरकतदार गजानन पुंडलिक खरबडे, बळवंत रामहरी शहाकार व ग्रामस्थांनी केली आहे. यासह निवेदनावर सरपंच प्रितम भगत दिलीप फुके, राजेश राठोड ,रमेश मुळे, बळवंत शाहकार, विलास आडे ,अमित ठाकूर ,सिद्धांत सुर्वे, प्रकाश सावळे, कैलास डोलारकर, मनोज जयस्वाल, अभिजीत तेलंग व गावातील सर्व मंडळी निलेश पंडीत,अजय तेलंग, अंबादास चव्हाण, आश्विन तेलंग आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अवैध धंद्यांविरोधात एल्गार; कारवाई न झाल्यास गृहमंत्र्यांकडे तक्रार

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



रिसोड शहरात सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात आता नागरिकांनी आवाज उठविण्यास सुरुवात केली असून, हे धंदे तात्काळ आणि कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी तसवर कादरी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पोलीस निरीक्षक चव्हाण यांना निवेदन सादर करून प्रशासनाने त्वरित कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

कादरी यांनी आपल्या निवेदनात शहरातील अवैध गुटखा विक्री, वरली-मटका, अवैध वाहतूक तसेच दारू व हातभट्टीसारख्या विविध अवैध धंद्यांचा उल्लेख केला आहे. या प्रकारांवर तात्पुरती कारवाई न करता ते कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत, अशी त्यांची ठाम मागणी आहे. अवैध दारू व हातभट्टीच्या व्यवसायामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून, काहींना आपला जीवही गमवावा लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा अवैध व्यवसायांचा समाजावर गंभीर व विपरीत परिणाम होत असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक असल्याचे कादरी यांनी म्हटले आहे.

दरम्यान, अवैध धंद्यांवर त्वरित कारवाई करून ते बंद करण्यात आले नाहीत, तर या प्रकरणाची थेट गृहमंत्र्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. तसेच भविष्यात प्रशासनाच्या विरोधात मोठा लढा उभारण्यात येईल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. आता या निवेदनानंतर पोलीस व प्रशासन कोणती भूमिका घेते आणि रिसोड शहरातील कथित अवैध धंद्यांवर कितपत प्रभावी कारवाई होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## बाबासाहेब धाबेकर विद्यालयातील मुलींनी बांधली झाडांना राखी

● सिटी न्युज ब्युरो @ केशवनगर ●

स्थानिक बाबासाहेब धाबेकर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी स्वतःच्या कौशल्याने राखी बनवत राखी पौर्णिमेच्या दिवशी शाळेच्या आवारातील झाडांना राख्या बांधुन त्यांचे जतन व संरक्षणाचा संदेश दिला या उपक्रमात इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थीनीनी उत्साहाने सहभाग नोंदविला प्रत्येक विद्यार्थीनीनी आपआपल्या वर्षभर निगा घेत असलेल्या झाडांना ओवाळुन राखी बांधतांना त्या झाडांप्रती आपलेपणाची



जाणिव ठेवत मायेने पुढेही अशीच त्यांची निगा राखण्याची शाश्वती दिली, शाळेचे मुख्याध्यापक व्हि. वाय. सांगळे यांच्या मार्गदर्शनात शाळेचे कलाशिक्षक रा.मूमु.पगार यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनात या विद्यार्थीनी व शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यानी हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला.

# भरधाव स्विफ्ट डिझायर कारची ॲटोस पाठीमागून जबर धडक;पाच प्रवासी जखमी

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**मलकापुर:** नॅशनल हायवे क्रमांक ५३ वर वाघुड-धानोरा परिसरातील नायरा पेट्रोल पंपासमोर भरधाव स्विफ्ट डिझायर कारने ऑटोला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या या भीषण अपघातात ऑटोचा अक्षरश: चुराडा झाला. या अपघातात ऑटोमधील ५ जण जखमी झाले असून, त्यापैकी शेख इरफान शेख इसाक (वय ५०) यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जळगाव (खां) येथे हलविण्यात आले आहे. तर अन्य जखमींवर मलकापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

नॅशनल हायवे ५३ वरील वाघुड-धानोरा मार्गावरील नायरा पेट्रोल पंपासमोर ऑटो क्रमांक एमएच २८ आर ३५७७ मलकापूरकडे येत असतांना पाठीमागून आलेल्या स्विफ्ट डिझायर कार क्र. एमपी ६८ झेड.ई २७५८ या वाहनाने ऑटोला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की, ऑटोचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला. या अपघातात शेख अलताफ शेख अकसर वय २२, साबीर खान उस्मान खान वय२४, शेख इरफान शेख इसा वय ५४, इरफान खान ईसा खान वय ४५, शेख समीर शेख सलीम वय २५ हे पाच जण सर्व रा.पारपेठ मलकापुर जखमी झाले. यापैकी शेख इरफान शेख इसा यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना जळगाव येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे. तर अन्य सर्व जखमींवर मलकापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातातील सर्व जखमी हे मुस्ताक अली नगर, पारपेठ येथील रहिवासी आहेत. या भीषण







अपघातामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. तर रूग्णालया जवळही नागरिकांची एकच गर्दी झाली होती. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# महागिरी महादेवाची यात्रोत्सवात भाविकांची गर्दी

## नियमांचे पालन करा, वन्यजीव विभागाचे आवाहन

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**संग्रामपूर :** हिरवाईने नटलेल्या सातपुडा पर्वतरांगेतील महागिरी येथे श्रावणातील तिसऱ्या सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) महादेवाची यात्रा भरणार असून, यानिमित्त भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. दुर्गम पर्वतरांगांमध्ये असलेल्या महागिरी महादेवाचे दर्शन घेण्यासाठी पंचक्रोशीसह दूरवरून शिवभक्त आणि कावडधारी दाखल होणार आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अंबाबरवा अभयारण्यातील अतिसंरक्षित गाभा (कोर) क्षेत्रात हे धार्मिक



स्थळ असल्याने वन्यजीव विभागाने भाविकांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. महागिरी येथील महादेवाचे अधिष्ठान उंच पर्वताच्या टोकावर असून, दर्शनासाठी अरुंद पाऊलवाटेने पायी जावे लागते. पर्वतावरील दगडी गुहेत महादेवाची पुरातन पिंड स्थापित आहे.

### महाप्रसादाची परंपरा कायम

» जटाशंकरप्रमाणेच महागिरी महादेव येथे महंत कृष्णानंद भारती (सिद्धपीठ श्री क्षेत्र वारी हनुमान) यांच्या वतीने सुरू करण्यात आलेली महाप्रसादाची परंपरा यंदाही कायम आहे. यासाठी आवश्यक साहित्य घेऊन रविवारी वारी हनुमान सेवाधारी ग्रुपचे सेवाधारी महागिरी महादेव येथे दाखल झाले. सोमवारी सकाळपासून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. ढोल, ताशे, डफळे, ध्वनिक्षेपकावर बंदी अभयारण्यात यात्रेदरम्यान ढोल, ताशे, डफळे, ध्वनिक्षेपक व इतर वाद्ये, तसेच तंबाखू, गुटखा, बिडी, सिगारेट, मद्य, कोणत्याही प्रकारची शस्त्रे अथवा धोकादायक साहित्य सोबत नेण्यास बंदी आहे.

» महागिरी येथील महादेवाचे मंदिर सोडून अभयारण्यातील इतर ५० मीटर परिसरात जाण्यास बंदी आहे. अतिसंरक्षित गाभा (कोर) क्षेत्रात भाविकांनी वन विभागाच्या सूचनांचे पालन करावे. बंदी असलेल्या वस्तू व साहित्य सोबत आणू नये. यात्रेच्या पार्श्वभूमीवर अभयारण्यात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.
**अजय बावणे,** वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), सोनाळा.

# खाटूश्याम यात्रेला मलकापुरातून 150 भाविकांचे प्रस्थान

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**बुलढाणा:** सद्भावना सेवा समितीच्या वतीने आयोजित विशेष खाटूश्याम तिर्थयात्रेसाठी रविवार रोजी मलकापूर रेल्वे स्थानकावरून १५० भाविकांनी श्री गंगानगर एक्सप्रेसने उत्साहात प्रस्थान केले.

समितीचे अध्यक्ष राधेशाम चांडक यांनी मलकापूर स्थानकावर उपस्थित राहून धर्मध्वज फडकावला व सर्व श्यामभक्तांना प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. ही तिर्थयात्रा ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत पार पडणार आहे.

या तिर्थयात्रेत लातूर, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, पुणे, भोपाळ यांसह विविध ठिकाणच्या भाविकांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, अमेरिकेतून अरुण पाटील व रेखा पाटील हे दांपत्यही या यात्रेसाठी आवर्जून उपस्थित राहिले आहे. या प्रसंगी सद्भावना सेवा समितीचे कार्याध्यक्ष चंपालाल शर्मा, तिलोकचंद चांडक, सुरेशचंद्र गट्टाणी, राजेश देशलहरा, सिद्धार्थ शर्मा, उमेश चांडक, प्रा. प्रकाशचंद्र पाठक, श्रीकांत धारकर, लालाभाई गुजराथी, सुभाष घोरपडे, उमेश मुंदडा, विजय व्यवहारे, सुभाष दर्डा, पुरणमल शर्मा, लाला माधवाणी, मनमोहन शर्मा आणि राजेश शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर व श्यामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या तिर्थयात्रेमुळे भाविकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे.

# शिक्षकाच्या घरातून 49 हजारांचा ऐवज लंपास

## नालंदा नगरातील घटना; परिसरात भीतीचे वातावरण

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**मलकापूर :** कुटुंबीयांसह बाहेरगावी गेलेल्या शिक्षकाच्या बंद घराचा दरवाजा व लोखंडी गेट तोडून अज्ञात चोरट्यांनी चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ४९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना मलकापूर शहरातील बुलढाणा रोडवरील नालंदा नगरात घडली. याच परिसरातील अन्य एका घरातही चोरीचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे.याप्रकरणी सिद्धार्थ देवचंद झनके (५७, व्यवसाय शिक्षक, रा. बुलढाणा रोड, नालंदा नगर, मलकापूर) यांनी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून २९ ऑगस्ट रोजी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, झनके हे २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता पत्नीसह सासऱ्यांना भेटण्यासाठी भुसावळ येथे गेले होते. ते २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:३० वाजता घरी परतले. या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराच्या मुख्य लाकडी दरवाजाची लोखंडी कडी-कोयंडा कापला. त्यानंतर आतील लोखंडी चॅनल गेट तोडून घरात प्रवेश केला. घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी हॉलमधील साहित्य तसेच दोन्ही बेडरूममधील कपाटे आणि सोफ्यातील साहित्य अस्ताव्यस्त केले. त्यानंतर चांदीचे दोन नेकलेस हार, दोन जोड पैंजण आणि १२ हजार रुपये रोख असा ऐवज घेऊन पोबारा केला.

**दागिन्यांची देखील चोरी**

चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये ११ हजार रुपये किमतीचा चांदीचा १ नेकलेस, ९ हजार रुपये किमतीचा स्टोनरत्न असलेला चांदीचा हार आणि १७ हजार रुपये किमतीचे जुने वापरातील दोन जोड पैंजण यांचा समावेश आहे. रोख रकमेसह चोरीस गेलेल्या ३ मालाची एकूण किंमत ४९ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, चोरट्यांनी याच परिसरातील संजय नथ्थु वहाटे यांच्या घरातही चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे एकाच टोळीने परिसरात घरफोडी केल्याची शक्यता व्यक्त होत असून, पोलिस त्या दिशेने तपास करीत आहेत. घटनेची माहिती मिळाल्यानंतर ३ मलकापूर शहर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. पुढील तपास अनील राऊत करीत आहेत

# महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा घेतला संकल्प

## रक्षाबंधनानिमित्त विशेष कार्यक्रम

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**खामगाव:** रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त 'वन एशिया नेटवर्क इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' कारखान्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांमार्फत एका विशेष रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कारखान्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी अत्यंत उत्साहाने सहभागी झाले होते.

कारखान्यातील महिला कर्मचाऱ्यांनी सर्व पुरुष सहकाऱ्यांच्या रक्षासूत्र (राखी) बांधून त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. या भावनिक आणि आत्मीयतेच्या क्षणी सर्व पुरुष सहकाऱ्यांनी आपल्या भगिनींना (महिला सहकाऱ्यांना) रक्षणाचे वचन दिले. कारखान्याचे व्यवस्थापन (मॅनेजमेंट) आणि पुरुष कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे असा संकल्प केला की, ते सर्व महिला कर्मचाऱ्यांना एक सुरक्षित, सन्मानजनक आणि पूर्णपणे भयमुक्त कार्यस्थळ प्रदान करतील. कार्यस्थळावरील आपसी बंधुभाव आणि सुरक्षेची भावना अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद ठरला. रक्षाबंधनाचा कार्यक्रम हा अनादी काळापासून सुरू असून या सणाला हिंदू संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे.भावाचे रक्षण व्हावे म्हणून बहीण भावाला राखी बांधतात.हा सण घरोघरी साजरा केला जातो. रक्षाबंधनाचा कार्यक्रम हा वर्षा कंपनीमध्ये घेऊन सलोख्याचे वातावरण निर्माण केले. कंपनीत काम करणारे हे सर्व एक कुटुंबासारखे बहीण- भावासारखे राहावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून उत्सव साजरा करण्यात आला.

# राष्ट्रपुरुषांचे विचार मनात रुजवा : डॉ. रामपाल धारकर

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**पिंपळगाव राजा :** राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करताना केवळ त्यांचे स्मरण न करता त्यांचे विचार मनात रुजविणे ही काळाची गरज आहे. युवकांनी राष्ट्रपुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक कार्यात पुढे यावे तसेच व्यसनमुक्तीचा संकल्प करावा, असे आवाहन प्रबोधनकार डॉ. रामपाल धारकर यांनी केले.

तालुक्यातील पिंपळगाव राजा येथे २९ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित प्रबोधन कार्यक्रमात डॉ. रामपाल धारकर बोलत होते. कार्यक्रमाला प्रेस क्लब खामगावचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, पत्रकार लुकमान परवाज, अमरावती येथील अनिल देशमुख आणि ह.भ.प. प्रल्हाद सातव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. थारकर म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून उपेक्षित व वंचित समाजघटकांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांनी वंचितांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठविला. अहोरात्र लोकहितासाठी कार्य करत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रासह देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी असून ते आत्मसात करून सामाजिक परिवर्तनासाठी युवकांनी पुढे येण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमात हार्मोनियम वादक सुनील गाईनकर, तबलावादक पंकज मिसाळे, तसेच साथसंगतकार पवन कदम व सारथी सुखदेव चिंचोळकर यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाचे संचालन प्रा. संजय पाटोळे व प्रदीप वानखडे यांनी केले. अध्यक्ष पवन पाटोळे , उपाध्यक्ष सूरज वानखडे, कार्याध्यक्ष सहदेव चंदनशिव, कोषाध्यक्ष दिलीप पाटोळे, सल्लागार संतोष पाटोळे आणि सचिव फकीरा कांबळे यांच्यासह वीर लहुजी नवयुवक सांस्कृतिक क्रीडा मंडळ व समस्त मातंग समाज बांधवांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला समाजबांधवांसह परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महसुलातील गैरकारभाराला लगाम; 'कलम 155'च्या वापरावर निर्बंध

## सातबारा, महसूल नोंदीतील केवळ लेखन-टंकलेखनाच्या चुका दुरुस्त करता येणार

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**खामगाव :** सातबारा उतारा, अधिकार अभिलेख आणि इतर महसूल नोंदींमधील चुका दुरुस्त करण्यासाठी असलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम १५५ च्या वापरावर राज्य शासनाने निर्बंध आणले आहेत. अधिकाराचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे आता महसुलातील गैरकारभाराला लगाम लागणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १५५ मध्ये अधिकार अभिलेख किंवा संबंधित नोंदवहीतील लेखन प्रमाद अथवा स्पष्ट चूक दुरुस्त करण्याची तरतूद आहे; मात्र या कलमाचा वापर करून जमिनीच्या मालकी हक्कात, हक्काच्या स्वरूपात किंवा नोंदीच्या मूळ आशयात बदल करता येणार नाही.

नावातील अक्षरदोष, टंकलेखनातील चूक, अंकातील स्पष्ट चूक किंवा मूळ अभिलेखाशी पडताळणी करता येणारा साधा लेखन प्रमाद यांचीच दुरुस्ती या माध्यमातून करता येणार आहे. वादग्रस्त नोंदींच्या दुरुस्तीसाठी मात्र संबंधित कायदेशीर प्रक्रियेचाच अवलंब करावा लागणार आहे.केवळ किरकोळ लेखनदोषांचीच दुरुस्ती दुरुस्तीमुळे एखाद्या व्यक्तीच्या हक्कात बदल होत असेल, नवीन हक्क निर्माण होत असेल किंवा अन्य व्यक्तीच्या हक्कावर परिणाम होत असेल, तर अशा बाबी कलम १५५ च्या माध्यमातून हाताळता येणार नाहीत. त्यासाठी संबंधित कायदेशीर प्रक्रिया अवलंबावी लागेल.

**शासकीय जमिनींच्या नोंदींसाठी वापर बंद**

शासकीय जमिनींच्या नोंदींमध्ये हक्क, धारणा किंवा जमिनीच्या स्वरूपाशी संबंधित बदल करण्यासाठी कलम १५५ चा आधार घेता येणार नाही. अशा प्रकरणांत संबंधित कायदे आणि सक्षम प्राधिकरणाची प्रक्रिया पाळावी लागेल.

अपिलाचा मार्ग, कलम १५५ चा वापर नको

एखाद्या महसूल आदेशाविरोधात अपील, पुनर्विचार किंवा अन्य कायदेशीर उपाय उपलब्ध असल्यास त्या मागएिवजी कलम १५५ चा वापर करून मूळ आदेशाचा परिणाम बदलता येणार नाही. कलम १५५ ही केवळ लेखन प्रमाद दुरुस्तीची तरतूद आहे; ती अपिलाला पर्याय नाही.

**वापरासाठी अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक**

कलम १५५ नुसार दुरुस्तीची कार्यवाही सक्षम महसूल अधिकाऱ्यांच्या स्तरावरच करावी लागणार आहे. संबंधित मूळ अभिलेख तपासून चूक ही केवळ लेखन प्रमाद आहे की नाही, याची खातरजमा केल्यानंतरच दुरुस्ती करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# गो. से. महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थिनी प्रा. तृप्ती पारस्कर यांना पी.एच.डी. प्रदान

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**खामगाव :** गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव अंतर्गत प्राणीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थिनी प्रा. कु. तृप्ती राजेंद्र पारस्कर यांना दि. २९/०८/२०२६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. गो. से. महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. बी. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी च्स्टडी ऑफ लिमनॉलॉजीकल डायव्हर्सिटी ऑफ लोअर ज्ञानगंगा डॅम निअर निमकवळा इन बुलढाणा डिस्ट्रिक्टज् अर्थात च्बुलढाणा जिल्ह्यातील निमकवळा परिसरातील निम्न ज्ञानगंगा धरणाच्या जलपरिसंस्थेतील भौतिक, रासायनिक व जैविक विविधतेचा शास्त्रोक्त अभ्यासज् या विषयावर पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले. तत्पूर्वी, दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, त्यांचे मार्गदर्शक तसेच संशोधन सल्लागार समितीचे समन्वयक डॉ जी. बी. काळे, डॉ संजय वराडे, पदयुत्तर प्राणीशास्त्र विभाग, सावित्रीबाई पुणे विद्यापीठ येथील बाह्य परीक्षक प्रा. डॉ. वर्षा वानखडे, महाविद्यालयातील डॉ. अशोक पडघन, प्रा नानासाहेब कुटेमाटे, डॉ जे. डी. पोरे, संशोधन सल्लागार समितीचे सदस्य, पदव्युत्तर प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी -विद्यार्थिनी, प्राध्यापक इ.च्या समक्ष झालेल्या च्ओपन डिफेन्स व्हायवाज् दरम्यान त्यांनी आपल्या संशोधन कार्याचे उत्कृष्ट व प्रभावी सादरीकरण केले .बाह्य परीक्षकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे अत्यंत समर्पकपणे व विस्तृतपणे दिली. आपण केलेल्या अभ्यासपूर्ण संशोधनाचे होणारे फायदे विस्तृत करतांना प्रा. कु. तृप्ती पारस्कर यांनी सांगितले की, दुर्मिळ किंवा पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्वाच्या जलीय प्रजाती व त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यास ह्या संशोधनाची मदत होईल,मानवी वापरासाठी पाण्याच्या गुणवत्तेचे केलेले आकलन, शेती, पशुधन किंवा इतर स्थानिक वापरासाठी उपयुक्त ठरेल. तसेच या अभ्यासातून मिळणारा डेटा भविष्यातील जलप्रदूषण, हवामान बदल, जैवविविधता, मत्स्यशास्त्र आणि जलपरिसंस्था व्यवस्थापनाच्या संशोधनासाठी संदर्भ म्हणून उपयोगी ठरेल. हे धरण आमच्या जिल्ह्याच्या पर्यावरणीय परिसंस्थेतील अन्नसाखळीचे संतुलन, जैवविविधतेचे संवर्धन आणि पर्यावरणीय स्थैर्य राखण्यात उपयुक्त ठरेल.यावर आम्ही एक पुस्तक प्रकाशित करणार असून त्या पुस्तकाचा येणारे संशोधक तसेच शेतकऱ्यांना सुद्धा फायदा होईल, असेही त्यांनी पुढे सांगितले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. बी. काळे यांनी सांगितले की, महाविद्यालयातील उपलब्ध संसाधनांचा जास्तीत जास्त आणि प्रभावी वापर करून आपल्या जिल्ह्यातील अद्याप दुर्लक्षित व पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या क्षेत्रांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. अशा क्षेत्रांवर शास्त्रीय पद्धतीने संशोधन करून त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे आणि ही क्षेत्रे शैक्षणिक व संशोधनाच्या नकाशावर प्रकाशझोतात आणणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याकरिता आमच्या संस्थेचे स्व. भाऊसाहेब बोबडे, स्व. बाबासाहेब बोबडे यांची स्फूर्ती व प्रेरणा नेहमीच आमच्या पाठीशी असते तसेच विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. मा. सुभाषराव बोबडे, सचिव डॉ. प्रशांत बोबडे आम्हाला नेहमीच प्रेरणा आणि स्फूर्ती देत असतात. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे संस्थेच्या विकासासाठी नवनवीन उपक्रम राबविण्याची ऊर्जा आणि आत्मविश्वास आम्हाला मिळतो. त्यांचे मार्गदर्शन ही आमच्यासाठी सदैव प्रेरणादायी शक्ती राहिली आहे. याप्रसंगी महाविद्यलायाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय वराडे यांनी प्रा. कु . पारस्कर यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रा. कु. पारस्कर आपल्या संशोधनाचे श्रेय आई -वडील, भाऊ - बहिणी;सासुबाई श्रीमती शालिनी औतकर,पती श्री विवेक औतकर, मुलगा चि.कियांश तसेच कुटुंबातील सर्व सदस्य यांना देतात. सदर कार्यक्रमाकरिता वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ ए.व्हि.पडघन, प्रा नानासाहेब कुटेमाटे,डॉ.प्राजक्ता बाठे, डॉ. दीपाली धरमकार, डॉ अशोक झुंजारे, डॉ. सचिन खंडारे, प्रा. मनोज बाभळे, प्रा. ज्योती शर्मा, प्रा. अनिकेत वानखडे, प्रा वर्षा कोकाटे,प्रा. ज्ञानेश्वर गायगोळ, प्रा मुकुंद सपकाळ प्रा .रंगनाथ ठोंबरे ,प्रा कु.नयना मिश्रा ,महाविद्यालयातील इतरही प्राध्यापक तसेच पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी -विद्यार्थिनी; कर्मचारी श्री माणिक थाटे ,प्रसाद खानोरे आदींनी प्रा .कु. पारस्कर यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा.शिवानी बोरोकार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सचिन खंडारे यांनी केले. अशी माहिती महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

# शेतरस्ता खुला करुन देण्यासाठी शेतकऱ्याचे उपोषण

प्रतिनिधी 31 ऑगस्ट

**उदयनगर :** येथून जवळच असलेल्या टाकरखेड हेलगा येथील शेतकरी रामकृष्ण कदम व दामोदर कदम हे आपल्या शेतात जाण्यासाठी रस्ता खुल्ला करून द्यावा, या मागणीसाठी २९ ऑगस्टपासून त्यांच्या गट नंबर ११५ मध्ये आमरण उपोषणाला बसले आहेत. गेल्या अनेक वर्षा पासून सदर रस्ता खुला करण्यासाठी या शेतकऱ्यांनी महसूल विभाग चिखली यांच्याकडे वेळोवेळी विंनती केली होती. या प्रकरणाचा बरेच वर्ष न्यायनिवाडा सुरु होता असे असतांना २०१६ साली तत्कालीन तहसीलदार यांनी रस्ता मोकळा करण्यासाठी आदेश पारित केला होता. परंतु प्रशासकीय यंत्रणेच्या उदासीन धोरणामुळे सदर शेतकऱ्यांना जमीन कसण्यासाठी फारमोठी जीवघेणी कसरत करावी लागत आहे. न्यायालयाचे आदेश असतांना आजपर्यंत सदर रस्ता आम्हाला आमच्या शेतात जाणे येण्यासाठी खुला करून दिलेला नाही. शेतकऱ्यांपुढे फार मोठा बिकट प्रश्न उभा राहिला आहे. न्याय मागावा तर कुठं? असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे. शेवटी लोकशाही मार्गाने सदर शेतकऱ्यांनी आमरण उपोषणाचा पावित्रा घेतला आहे. या शेतकऱ्यांची ७ एकर जमीन या वर्षी पडीत पडली आहे. आमची न्याय्य बाजू असून सुद्धा आम्हाला न्यायासाठी आमरण उपोषणाला बसावे लागत आहे. असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


## सोयाबीनवरील पाने खाणाऱ्या अळ्यांचे व्यवस्थापन करा!

**अकोला :** शेतकऱ्यांसाठी सोयाबीन हे महत्त्वाचे नगदी पीक असून, त्याच्या उत्पादनावर शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. सोयाबीनच्या उत्पादकतेवर परिणाम करणाऱ्या प्रमुख कारणांमध्ये किडींचा प्रादुर्भाव महत्त्वाचा आहे. सध्या सोयाबीन पिकावर उंटअळी तसेच तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने शेतकऱ्यांनी पिकाचे नियमित निरीक्षण करून वेळीच एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन कृषी विद्यापीठातील कीटकशास्त्र विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. त्यातच सध्या पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने सोयाबीन पीक धोक्यात सापडले आहे.

# प्रभारराजच्या ओझ्याखाली विकासकामांचा बोजवारा!

## जि.प.चा सावळागोंधळ: 'एक अधिकारी, अनेक खुर्च्या'; पंचायत राज व्यवस्था,लोकशाही विकेंद्रीकरण धोक्यात

प्रवीण वानखडे ३१ ऑगस्ट




**अकोला :** जिल्हा परिषदेत सध्या जनसेवेपेक्षा 'खुर्च्यांचा खेळ' अधिक जोरात सुरू आहे !. ज्या विभागांवर कोट्यवधींच्या विकासकामांची आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांची जबाबदारी आहे, तीच पदे वर्षानुवर्षे 'अतिरिक्त प्रभारा'च्या कुबड्यांवर ढकलली जात आहेत.

एका-एका अधिकाऱ्याच्या खांद्यावर दोन ते तीन महत्त्वाच्या खात्यांचे ओझे लादण्यात आल्याने अकोला जिल्हा परिषदेचा कारभार पार कोलमडला असून, प्रशासनाला 'व्हेंटिलेटर'वर ढकलल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. लोक कल्याणकारी राज्य ही संकल्पनाच धुळीस मिळविली जात आहे. अकोला जिल्हा परिषदेतील हे 'एक अधिकारी – अनेक पदे'चे मॉडेल म्हणजे विकासाच्या नावाखाली सुरू असलेला निव्वळ फार्स आहे. 'नियमित पदे भरण्यासाठी सरकारला मुहूर्त मिळत नाही की जानबुजून प्रभारराज ठेवून कोणाचे उकळपांढरे केले जात आहे?' असा जळजळीत सवाल आता जनतेतून विचारला जात आहे. महत्त्वाच्या पदांवर कायमस्वरूपी अधिकाऱ्यांची नियुक्ती तातडीने केली नाही, तर अकोल्याचा ग्रामीण विकास कायमचा ठप्प पडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आता नागरिक व विविध संघटना देत आहेत.

### पंचायत विभागाची तारांबळ

तेल्हारा बीडीओ अशोक बांगर यांच्याकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) पदाची जबाबदारी देऊन ग्रामीण विकासाची सूत्रे दुय्यम ठरवली जात आहेत.कृषी अन् समाजकल्याण एकाच खांद्यावर: कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांच्याकडे जिल्हा कृषी अधीक्षक आणि समाजकल्याण अधिकारी पदांचा अतिरिक्त पदभार आहे. बळीराजाचे प्रश्न आणि वंचित घटकांच्या योजना सांभाळताना या एकाच अधिकाऱ्याची कशी कसरत होत असेल, याचा अंदाज न लावलेलाच बरा !

### बांधकाम आणि पाणीपुरवठाही प्रभारींच्या हाती

प्रकाश इंगळे यांच्याकडे 'कार्यकारी अभियंता बांधकाम', तर अतुल साळुंखे यांच्याकडे 'जिल्हा संधारण अधिकारी'चा अतिरिक्त पदभार सोपवून विकासकामांना थेट ब्रेक लावण्यात आला आहे. एम आर ई जी एस कक्षातील अमोल पडवळ यांच्यावरही अतिरिक्त प्रभाराचीच कुरघोडी सुरू आहे.

### 'प्रभारराज'चा असा आहे खाक्या

सामान्य प्रशासन ते ग्रामीण विकास एकाच हाती कसे असा प्रश्न उपस्थित होतो. उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांच्याकडे स्वतःच्या खात्यासोबतच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) या अत्यंत महत्त्वाच्या पदांचा प्रभार आहे. एकाच अधिकाऱ्याने किती ठिकाणी लक्ष द्यायचे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### दोन तालुक्यांची धुरा अन् जलजीवनचा भार

मुर्तीजापूरचे गटविकास अधिकारी एम. बी. मोरे हे एकाच वेळी मुर्तीजापूर, अकोला तालुका बीडीओ आणि 'जलजीवन मिशन'चे प्रकल्प संचालक असा तिहेरी प्रभार सांभाळत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेचा कारभार प्रभारींच्या भरवशावर सोडून प्रशासनाने काय साध्य केले, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

### 'रामभरोसे' कारभार जनता भरडली, अधिकारी वैतागले !

नियमित अधिकाऱ्यांची नेमणूक न करता केवळ प्रभाराचा जुगाड चालवून सरकार नेमके काय साध्य करत आहे? दोन-दोन तालुक्यांचे बीडीओ पद आणि कोट्यवधींच्या योजना एकाच अधिकाऱ्याकडे असतील, तर निर्णयप्रक्रियेत विलंब होणे अटळ आहे. क्षेत्रीय पाहणी अभावी भ्रष्टाचाराचे पेकाट पसरत असून, सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी धुळ खात पडून आहेत. एकाच वेळी दोन ठिकाणी स्वाक्षऱ्या आणि बैठका पार पाडताना अधिकाऱ्यांचीही पुरती दमछाक होत आहे.

## स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय आणि मां गायत्री प्राथमिक शाळेत ज्युनियर लिनेस क्लबची स्थापना



प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अकोला :** ऑल इंडिया लिनेस क्लब तर्फे स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय अकोला व माँ. गायत्री प्राथमिक शाळा अकोला येथे ज्युनिअर लिनेस क्लबची स्थापना करण्यात आली. क्लबच्या अध्यक्षपदी एकता रामराव मेश्राम, सचिवपदी अंकिता पंकज मेश्राम तसेच गुंजन विजय चव्हाण हिची क्लबच्या कोषाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाला लिनेस क्लबच्या प्रांत अध्यक्षा सौ. कल्पनाताई देशमुख, क्लबच्या अध्यक्ष राजश्री समनपुरे, कोषाध्यक्षा सौ. अलका उमाळे प्रामुख्याने उपस्थित होत्या. या कार्यक्रमा अंतर्गत जल संरक्षण उपक्रम राबविण्यात आला कार्यक्रम पार पाडण्यात शिक्षिका सौ. मिना काटे, सौ. चंदा रोकडे, वर्षा हिवराळे, कल्पना सोळंके, वैशाली गवई, प्रिती पोके, तसेच कर्मचाऱ्यांमध्ये योगेश गोटे व रंजित ठाकूर यांनी सहकार्य केले.

## अकोलेकरांना आता आठ दिवसांनी पाणी पुरवठा



प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अकोला:** काटेपूर्णा प्रकल्पात गेल्या वर्षी ऑगस्ट अखेर ९१ टक्के जलसाठा होता. तिथे आज केवळ २४.९० टक्के साठा आहे. पाणी पातळी वाढली नाही तर येत्या काही दिवसांत अकोलेकरांवर पाणी कपातीचे संकट ओढवू शकते. आठ दिवसाआड पाणी पुरवठा करण्याशिवाय पर्याय नाही असे महापालिका प्रशासनाचे म्हणणे आहे. ऑगस्ट अखेर काटेपूर्णा प्रकल्पाची पाणी पातळी वाढली नाही. येत्या काही दिवसांत चांगला पाऊस झाला तरच जलसंचय होऊ शकतो. शहराला सध्या पाचव्या सहाव्या दिवशी पाणी पुरवठा होतो आहे. परंतु पाऊस झाला नाही तर आठ दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागू शकतो. सध्या निर्माण झालेली परिस्थिती पाहता शहरवासीयांनी पाण्याचा वापर जपून करावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी केले आहे.

## पैगाम रहमत-ए-आलमच्या सर्वधर्म समभाव कार्यक्रमाला अकोल्यात उदंड प्रतिसाद!

### वहदत ए इस्लामी हिंद अकोलाकडून कार्यक्रमाचे शानदार आयोजन

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**अकोला :** वहदत ए इस्लामी हिंद अकोला च्या वतीने 'पैगाम रहमत-ए-आलम या अखिल भारतीय अभियानाअंतर्गत शनिवार, २९ ऑगस्ट रोजी टॉवर चौकातील हॉटेल रीजन्सी येथे एका सर्वधर्मीय कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. समाजात वाढणारे प्रदूषण, व्यसनाधीनता, स्त्री भ्रूणहत्या आणि आत्महत्या या चार महत्त्वपूर्ण समस्यांवर जनजागृती करणे आणि प्रेषित मोहम्मद साहेब यांच्या शिकवणीचा प्रसार करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपले विचार मांडले. डॉ. जीशान हुसैन अफजा हॉस्पिटल यांनी इस्लामी समानता आणि सामाजिक सौहार्दावर प्रकाश टाकला. ज्येष्ठ मानसोपचार तज्ञ डॉ. दीपक केळकर यांनी व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांवर मार्गदर्शन केले. अकोला बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. वानखडे यांनी सामाजिक समस्या आणि कायद्याची भूमिका यावर भाष्य केले. जनाब अब्दुल वहाब यांनी मराठी भाषेतून या अभियानाच्या चारही प्रमुख मुद्द्यांवर अत्यंत प्रभावीपणे विचार मांडले. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते डॉ. तनवीर अहमद यांनी चारही ज्वलंत मुद्द्यांसोबतच प्रेषित मोहम्मद साहेब यांची शिकवण आणि संदेशांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी मानवतेचा संदेश देत सर्व मानवाने प्रेषित मोहम्मद साहेब यांच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले.

## पर्यावरण संवर्धन अन् महिला सक्षमीकरणाचा अनोखा संगम

### अकोल्यात ४ सप्टेंबरला २० हजार विद्यार्थ्यांचा 'महासंकल्प'

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अकोला :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष कृतीतून घराघरांत पोहोचविण्यासाठी अकोल्यात एक भव्य उपक्रम साकारत आहे. 'ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प' आणि 'निलेश देव मित्र मंडळ' यांच्या संयुक्त पुढाकारातून शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी शहरात एकाच वेळी चार वेगवेगळ्या ठिकाणी भव्य 'पर्यावरणपूरक शाडू माती गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा' पार पडणार आहे. या महाउपक्रमात ३० हून अधिक शाळांमधील तब्बल २० हजार विद्यार्थी सहभागी होणार आहे.



एकाच वेळी चार ठिकाणी पर्यावरणाचा जागर शुक्रवारी सकाळी ८:०० वाजता सुरू होणाऱ्या या कार्यशाळेसाठी शहरात चार प्रमुख केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज मैदान तापडिया नगर, स्व. शंकरलाल खंडेलवाल कॉलेज पटांगण, जुने शहरजानोरकर मंगल कार्यालय, रिंग रोडप्रभात किड्स स्कूल, पातूर रोडविद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून शाडू मातीपासून स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती घडवण्याचे प्रात्यक्षिक दिले जाईल. यासोबतच पी.ओ.पी. मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण, निर्माल्य व्यवस्थापन आणि विसर्जनानंतर मूर्तीच्या मातीत तुळशीचे रोप लावण्याचा संदेश दिला जाणार आहे.

सुसज्ज साहित्य व्यवस्थापन आणि तज्ज्ञ मार्गदर्शकमोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होणार असल्याने साहित्य वितरणासाठी स्वतंत्र पथक सज्ज करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना शाडू माती, लहान पाट, आईस्क्रीम चमचे, टूथपिक आणि अल्पोपाहार थेट त्यांच्या हातात दिला जाईल. या उपक्रमात शरद कोकाटे मुख्य मार्गदर्शक म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. त्यांच्यासोबत प्रा. डॉ. ज्ञानसागर भोकरे प्रा. गजानन बोबडे, श्रीमती कल्पना राव आणि अमृता सेनाड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. सायंकाळी 'तेजस्वी आत्मनिर्भर महाबाजार'चा शुभारंभ पर्यावरणपूरक उपक्रमासोबतच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला गती देण्यासाठी ४ ते ६ सप्टेंबर २०२६ दरम्यान 'तेजस्वी आत्मनिर्भर महाबाजार'चे आयोजन करण्यात आले आहे. ४ सप्टेंबर, सायंकाळी ४:०० वाजता (छत्रपती शिवाजी महाराज मैदान, तापडिया नगर)वैशिष्ट्य: महिला गृहउद्योग, हस्तकला, वस्त्रे, घरगुती उत्पादने आणि फूड स्टॉल्सना थेट बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार आहे. या उपक्रमात १० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यंदा ही संख्या २० हजारांवर पोहोचली आहे. महाराष्ट्रात एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात शाडू माती गणेशमूर्ती कार्यशाळा आयोजित होण्याचा हा पहिलाच प्रयोग असल्याचे आयोजकांनी सांगितले.या उपक्रमासाठी अकोला महानगरपालिका, शाश्वत पर्यावरणपूरक अभियान, खंडेलवाल महाविद्यालय, प्रभात किड्स स्कूल, इनर व्हील क्लब ऑफ अकोला क्वीन्स आणि बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. अशी माहिती निलेश देव यांनी दिली.

## जुन्या वादातून बडनेरा येथे तरुणाची हत्या

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट

**अमरावती :** पाच ते सहा जणांनी हल्ला करून जुन्या वादातून एका तरुणाची हत्या केली. ही घटना आज दुपारी पाच वाजता दरम्यान बडनेरा येथील आठवडी बाजार परिसरातील एका देशी दारूच्या दुकानात घडली आहे. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर अमरावतीतील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. शेख कासिम शेख शकील ( 24 रा. गुलदस्ता नगर) असे मृतकाचे नाव असून गंभीर जखमी असलेला शोहेब



शहा उर्फ गुड्डू ( 22 रा )नवी वस्ती बडनेरा या युगावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. पोलिसांचे एक पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. त्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली आणि एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

## बाळापूर बसस्थानकाला विळखा

प्रतिनिधी ३१ ऑगस्ट



**बाळापूर:** बाळापूर शहरातील बसस्थानक परिसरात खासगी तसेच प्रवासी वाहनांचा वाढता वावर नागरिकांसाठी आणि एसटी बसेससाठी डोकेदुखी ठरत आहे. बसस्थानकाच्या सुमारे २०० मीटर परिसरातच मोठ्या प्रमाणात खासगी वाहने उभी राहत असल्याने नियमित ये-जा करणाऱ्या एसटी बसेसना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बसस्थानकाच्या परिसरात प्रवासी वाहने रस्त्यावरच उभी केली जात असल्याने वाहतुकीचा खोळंबा निर्माण होत आहे. बसमध्ये चढणारे-उतरणारे प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांनाही याचा त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. बसस्थानकासमोरच वाहने अस्ताव्यस्त उभी राहत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला असून, वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

विशेष म्हणजे, या प्रकाराबाबत बाळापूर शहरातील काही नागरिकांनी ३ ऑगस्ट रोजी बाळापूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली होती. मात्र, तक्रार करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रारीनंतरही बसस्थानक परिसरातील परिस्थितीत फारसा बदल झालेला नसून, खासगी वाहनांचा सुळसुळाट कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एसटी बसेसना अडथळा निर्माण होण्याबरोबरच सामान्य प्रवाशांनाही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.बसस्थानक परिसरातील अनधिकृत पार्किंग आणि प्रवासी वाहनांवर तातडीने कारवाई करून वाहतूक सुरळीत करावी.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135